शनिवार । २७ जून १९८१ । एक रुपया

# माणूस

## उत्तर मीमांसा :

पृष्ठ....५

दलित आणि ग्रामीण विद्यार्थ्यांचा पोरकेपणा दूर होणे ही आजची जास्तीत जास्त महत्त्वाची आणि निकडीची सामाजिक गरज आहे. त्या विद्यार्थ्यांना आपलेपणाची ऊब जर मिळाली नाही तर परस्परांसंबंधी अविश्वास आणि संशय बाळगणाऱ्या नव्या चिरफळचा या समाजाला ग्रासतील. सर्व भारतीय समाज एकरस करण्याचे आपले स्वप्न — त्याला आणखी तडे जातील. करिता, आजच त्वरा केली पाहिजे.





परदेशातून कुंभार कामाचं प्रशिक्षण घेऊन श्री. मिरमिरा चांदा जिल्ह्यात भद्रावती येथे आले. गावातले लोक त्यांनी गोळा केले. मालाच्या उत्पादन आणि विक्रीसाठी सहकारी तत्त्वांवर ग्रामोद्योग संघाची स्थापना केली. हे सारं करत असताना पहिले काही महिने त्यांना गांधी स्मारक निधीतून महिन्याला शंभर रुपये मिळत. पुढे तेही बंद झाले. मग कधी चणे-फुटाणे खाऊन, कधी कपभर चहा तर कधी फक्त पाणी पिऊन त्यांनी दिवस काढले. त्यांच्या या तपश्चर्येचं फळ आता साऱ्या गावाला मिळतं आहे.

## मुंबई वार्ता

पृष्ठ....१

पुणे वार्ता

# पुणे महापालिकेत यंदा अपक्षांचं वर्चस्व

पुणे महानगरपालिका, शहरातील ११ लाख लोकसंख्येचे प्रतिनिधित्व ५५ नगरसेवक करतात. दरवर्षी निरनिराळ्या पदासाठी होणाऱ्या निवडणुका हे याचे वैशिष्ट्य. निवडणुकीतले राजकारण मात्र अगम्य. कोणता माणूस निवडून येईल व कशा प्रकारे येईल हे त्या परमेश्वरालाही ठाऊक नसेल! प्रत्येक पक्षातील नगरसेवकांच्या संख्येनुसार काही अदाज, दिलेल्या शब्दाप्रमाणे मतदान आदेशानुसार कृती या क्षुल्लक गोष्टी कोणी फारशा मनावर घेत नाही. साधारणतः जून सुरू झाला की प्रथम स्थायी समितीच्या सदस्याची व नंतर समितीच्या अध्यक्षांची निवड होते. इथपासून राजकारणाचे पडघम वाजायला लागतात आणि महापौर-उपमहापौरपदाची निवडणूक संपेपर्यंत हे संगीत चालू राहतें. सपना, पूनम, श्रेयस, कावेरी; विश्वकमल या हॉटेलांमधून रात्रभर बैठकी, विरंगुळा म्हणून जेवण व आराम म्हणून इतर गोष्टीही पर्यायाने आल्याच. निवडणुकीच्या शेवटच्या चार दिवसात हा प्रकार शिगेला पोहोचतो. रात्रीच्या कार्यक्रमाची आखणी महापालिकेच्या हिरवळीवर होते. कोणाला मातीत घालायचे, कोणाला झोपवायचे, प्लॅन कसा करायचा त्या दृष्टीने निरोपा–निरोपी येथेच होते. महापालिकेत एक काळ गाजवलेल्या समाजातील काही प्रतिष्ठित व्यक्तीनाही या निवडणुकामध्ये रस असतोच. 'बिहाइंड द कर्टन' राहून एका वेळी अनेक जणांना विविध पदांची आश्वासनं देऊन ही मंडळी नगरसेवकांमध्ये बोटाच्या इशाऱ्यावर कोंबडी झुजवतात.

या साठमारीत यंदाच्या वर्षी काय होईल याचा काहीसा अंदाज शोधण्याचा प्रयत्न करण्यापूर्वी गेल्या दोन वर्षांतलं महापालिकेतलं राजकारण पाहिलं पाहिजे. १९७९ मध्ये बहुमतावर व काही मतं मिळवून पुलोद आघाडीचे श्री. पांडुरंग तरवडे हे महापौर आणि श्री. मोहन पवार उपमहापौर झाले. त्यानंतर स्थायीसमिती व वाहनव्यवहार समितीमध्ये दोन सभासदांनी ऐन वेळी पक्षाला धाब्यावर बसवून विरोधी पक्षाच्या संगनमताने अध्यक्षपदाच्या खुर्च्या मिळवल्या. महापालिकेतल्या राजकारणाला तेथपासून एक वेगळं वळण मिळालं. त्या वर्षीच्या कारकीर्दीत कलकत्ता-दौरा प्रकरणाने आणखी भर टाकली. येरवडा, कोथरूड भागात जास्तीत जास्त योजना ओढण्याच्या स्थायी समितीच्या अध्यक्षाच्या (श्री. रामभाऊ मोझे) प्रयत्नांवर बरेच नगरसेवक नाराज झाले. यातून सरळ सरळ संतुष्ट-असंतुष्ट यांचे गट तयार झाले. एकाला 'गोल्डन गँग' या नावाने संबोधले जाऊ लागले. या गँगमधील मंडळी अति हुशार, हिकमती, शिवाय अनुभवी, याउलट दुसऱ्या गटामध्ये कित्येक महापालिकेत नव्यानेच प्रवेश करणारी; पण महापालिकेत निवडून आल्याने राजकारणात तयार.

या पार्श्वभूमीवर गेल्या वर्षीची (१९८०) निवडणूक झाली, पुलोद आघाडीतर्फे ॲड. सुरेश तौर महापौरपदासाठी तर डॉ. सतीश देसाई उपमहापौरपदासाठी! त्याना विरोधात काँग्रेस (आय)चे नारायण खराडे व अपक्ष गटाचे म्हणजे पर्यायाने गोल्डन गँगचा पाठिंबा असलेले केशवराव पवार. डॉ. सतीश देसाई याना सर्वांत जास्त मते पडतील असा अंदाज त्याचे मित्र-नगरसेवक, बाहेरचा गोतावळा व्यक्त करीत होता.

पण दगाफटक्याची शंका येऊन एका काँग्रेस (अरस)च्या कॉंट्रॅक्टर असलेल्या नेत्याने दम भरला, 'महापौराला दगा दिलात तर एक मत डॉक्टरला जाणार

पृष्ठ २१ वर

**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकविसावे

अंक : चवथा

२७ जून १९८१

किंमत : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

## मुंबई वार्ता

# □ मराठी रंगभूमीची परंपरा : धावते दर्शन

उतरणाऱ्या उन्हाळ्याचं स्वतःचं असं एक खास वैशिष्ट्य असतं. पिवळीधमक, लखलखीत उन्हं, भाजून काढणाऱ्या हवेचे झोत आणि मुंबईबद्दल बोलायचं झालं तर उकाडा आणि घाम नामे मुंबईच्या जीवनात अत्यावश्यक असलेला घटक, लालभडक, पेटते गुलमोहर आणि उन्हाच्या तरल, पारदर्शक पिवळ्या रंगाचे लॅबर्नम ही अगदी खास उन्हाळी वातावरणाची झाडं. काँक्रीटच्या जंगलांनी दबून गेलेली मुंबईची जमीन आपल्या पोटात या साऱ्या वृक्षवल्लरीला अगदी मायेनं जवळ करत असते. उन्हाळा सरत चालला की झळाळत्या निळ्या आकाशात उगीच आपलं काळं गालबोट लागावं तसा एखाददुसरा काळा ढग दिसायला लागतो. कधी एखादी हलकीशी पाऊसशिंपण होऊन जाते. उन्हाळ्यातला रक्तवर्णी पिसारा सोडून गुलमोहराची झाडं, तमाम लेखक–कवींचा पेटंट असा 'सृष्टीमातेचा हिरवा शालू' रंगवायला घेतात !

आणि मग एखाद्या दुपारी घनगंभीर गडगडाट आणि विजांचा चमचमाट करीत गेट वे ऑफ इंडियातून पर्जन्यराज मुंबईत येतात! तास–दोन तास मुंबईभेटीचा जोरदार सोहळा होतो आणि मग पाऊस घरचाच होतो. 'ऑफिसमधून घरी परतणाऱ्या हजारो मुंबईकरांची धांदल' किंवा 'वीजप्रवाह बंद पडल्यामुळे मध्यरेल्वेची वाहतुक विस्कळीत' असे वर्तमानपत्रातले ठरीव मथळे किंवा सखल भागात साचलेल्या पाण्याचं एखादं छायाचित्र पावसाच्या या आगमनावर शिक्कामोर्तब करतं !

मात्र नेमेची येणाऱ्या या सृष्टीच्या कौतुकानं, जून निम्मा जलटून गेला, तरीही अजून मुंबापुरीला दर्शन दिलेलं नाही. अरबी समुद्रावरचे कमी आणि जास्त दाबाचे पट्टे अजूनही हवामान खात्याला हुलकावणी देताहेत. उन्हाळा अजूनही ऐन भरातच वाटतो आहे. कोपऱ्यावरचे ऊस-रसवाले, गेटवेचे नारियल-पानीवाले, जुहू चौपाटीचे कुल्फीवाले, दादर टी. टी. च्या फ्रूट ज्यूस वाल्याच्या दुकानासमोची गर्दी अजूनही हटलेली नाही. आणि जे पब्लिक इथे कुठे सापडणार नाही ते सगळं छबिलदास शाळेसमोरच्या श्रीकृष्ण भेळपुरीवाल्याकडे असणार ! छबिलदासचा हा परिसर म्हणजे मुंबईतलं एक आधुनिक सांस्कृतिक केन्द्रच बनलं आहे ! एका बाजूला बटाटेवडादार श्रीकृष्ण आणि दुसऱ्या बाजूला प्रायोगिक नाटकवाल्यांची छावणी छबिलदास, म्हणजे छबिलदासच्या नित्यपरिचितांचा परिपाठ आणि नवशिक्या, शिकाऊ रसिकाची पर्वणी !

संध्याकाळच्या सुमाराला श्रीकृष्णच्या खमंग आतिथ्याला न्याय देऊन छबिलदासमध्ये चक्कर मारली तर कसा वेळ जातो ते कळणार नाही ! मुंबईसारखाच छबिलदास हाही एक अघळ–पघळ आणि सर्वसमावेशक प्रकार आहे. अनेक प्रकारच्या गोष्टी इथं सुखानं एकत्र नांदत असतात. आत शिरल्याशिरल्या नाटकाच्या तिकिटविक्रीसाठी बसलेला एखादा 'प्रायोगिक' तरुण–तरुणी असेल. त्याशेजारी 'महिला ॲकॅडमी'ची पाटी. समोर 'व्यवसाय ज्ञान केंद्र (अधिक माहिती वरच्या मजल्यावर मिळेल)!' प्रौढ शिक्षणाचा वर्ग संपवून खाली उतरणारे प्रौढ तेवढ्यात दिसतील. मग एखादी ज्योतिष्य ज्ञानसंस्थेची पाटी किंवा 'रेडिओ रिपेरिंग शिका' असं जाहीर आव्हान बघायला मिळेल. कचऱ्याच्या डब्यावरच्या 'कचरा ह्यात टाका' अशा शिस्तशीर शालेय सूचनेत 'घ' चा 'मा' केलेला दिसेल आणि 'कचोरी दह्यात टाका' असा अनाहूत रसभरित सल्ला दिलेला असेल. शिवाय नाटकवाल्यांनी तर छबिलदास झपाटूनच टाकलं आहे ते वेगळंच ! तिथल्या तिकिटविक्रीच्या बाकांवर आणि बाजूच्या पायऱ्यांवर नाट्यक्षेत्रातले किती तरी दिग्गज बसून गेले असतील ! या सगळ्या प्रकारातून वाट काढून 'इथे शाळासुद्धा चालते' अशा एखादी पाटी खरं म्हणजे इथे लावायला पाहिजे आहे !

वरती नाटकाच्या थिएटरमध्ये नेहमीच लगीनघाई ! काळ्यानिळ्या विंगजची मांडामांड. 'अरे तो पाचवा स्पॉट बघ जरा,' 'हा डिमर पहायला पाहिजे बरं का एकदा,' 'माझा आवाज बघ बरं जरा येतोय का शेवटपर्यंत,' 'पण वेणी, पुस्तक आणि कार्ड तुला आणायला सांगितलं होतं. च्यायला, असंच सगळं ऐन वेळी विसरा आणि गोची करा आमची,' 'अरे, चला तुम्ही आतमध्ये, चला पफ मारून घ्या,' असा गदारोळ सुरू असतो.

नुकताच छबिलदासला जायचा योग आला तो 'अधांतरी' हे नवं नाटक बघण्यासाठी. 'द म्युटंटस्' या नव्या ग्रुपचं हे पहिलंच नाटक. प्रभाकर पेंढारकरांच्या 'अरे ससार संसार' या बऱ्याच गाजलेल्या कादंबरीवरून दिलीप खाडेकरानी ते लिहिलं आहे. म्युटंटस्‌चा हा पहिला प्रयोग ठीक झाला. हे नाटक ज्यानं पाहिलं असेल तो त्यांच्या पुढच्या नाटकाची वाट पाहील एवढं निश्चित. मध्यमवर्गाच्या आर्थिक आणि भावनिक ओढाताणीचं चित्रण करणारं हे नाटक अगदी छबिलदास–छापाचं मात्र नाही, ते पुष्कळच व्यावसायिक आणि रूढ वळणानं जातं.

पण प्रायोगिक नाटकाच्या परंपरेची रंगवार्ता, के. टी. देशमुखापर्यंत पोचली नसावी असं दिसतंय. 'मराठी रंगभूमी आणि भारतीय रंगमंच' या जवळजवळ त्यांनीच भरवलेल्या प्रदर्शनात आधुनिक मराठी रंगभूमी केवळ 'मत्स्यगंधा' आणि 'रायगडाला जेव्हा जाग येते' इथपर्यंतच येऊन थबकली होती. याहून निराळ्या अशा नाट्यपरंपराना काहीच प्रतिनिधित्व इथं मिळालं नव्हतं. प्रदर्शनातली आणखी एक उणीव अशी की, तिथल्या पुस्तकं, फोटो, कागदपत्रं या साऱ्यांच्या मांडणीमध्ये एखादं सूत्र आहे किंवा काही अर्थपूर्ण क्रम आहे असं जाणवत नव्हतं; पण एकट्या के. टी. देशमुखांच्या परिश्रमातून एवढं मोठं प्रदर्शन उभं राहिलं ही मात्र खरी कौतुकाची बाब! प्रदर्शन बरंच आकर्षक होतं; कारण निव्वळ ऐतिहासिक सत्य जाणून घेण्याचा विद्वत्तापूर्ण व्यास जरी सोडला, तरी करमणूक करणारे असे अनेक बारीक–सारीक तपशील इथं होते. जिथं मराठी नाटकाची सुरुवात झाली तो सांगलीचा सरकारवाडा, कोल्हापूरच्या देवळाचा गरुडमंडप, मिरजेचा हरबक्षा वाडा, आशियातलं पहिलं थिएटर 'बॉम्बे थिएटर' (जिथे आता टाउन हॉल आहे). वाजिद·

अलीशाहने लखनौला बांधलेलं थिएटर, शेक्सपिअरची नाटकं करणारे 'एल्फिन्स्टोनियन अमॅच्युअर्स' अशी काही चित्रं खास आहेत. बागेचा, किल्ल्याचा किंवा नदीकिनारीच्या देखाव्यांच्या पडद्यांचं आज काही विशेष महत्त्व राहिलेलं नाही. कारण आजचं तंत्र किती तरी प्रगत झालेलं आहे; पण तरीही त्यांच्या भोवती नोस्टॅल्जियाचं एक सुखद वलय वाटतं. भारतामध्ये अर्वाचीनकाळात नाटकाला व्यावसायिक स्वरूपे देण्याची सुरुवात एक प्रकारे मराठी रंगभूमीपासूनच झाली. कारण तिकिटं छापण्याचा पायंडा मराठी रंगभूमीनं घालून दिला. आजच्या काळात जिच्यावाचून पानही हलत नाही अशी ६५ वी कला ऊर्फ जाहिरात त्याही काळात किती जोमात होती पहा! अळतेकराच्या एका 'हिंदू नाटका'ची जाहिरात मोठी मजेशीर आहे 'मौजेची रात्र, खेळ १५ आख्यान देवेन्द्र–वृषपर्व युद्ध व वृषपर्व–वध. श्रीयाळचरित्र आणि नारायणराव पेशवे याचा मृत्यू. यात पहिल्या भागात तरवार देखावा होईल. दुसऱ्या भागात चिल्हाळाचे शीर कापून शीर व धड यांचा देखावा दाखवला जाईल. तिसऱ्या भागात नारायणरावाचे पोट फाडून साखरभात आणि आतडी हुबेहुब दाखवू. (यात ४ रस असून शोकरसपूर्ण होईल.) फार्स रात्रीच्या वेळी पाहिल्यास चमत्कारिक होईल.' २३ ऑगस्ट १८७३ च्या एका प्रयोगाची ही जाहिरात आहे. हे नक्कीच तेव्हाचं 'हॉट अँड हिट' नाटक म्हणून गाजल असणार! 'प्रत्यक्ष रंगमंचावरून धडाडत जाणारी रेल्वे पहा!' याची ही १९ व्या शतकातली आवृत्तीच म्हणायला हवी!! आणखी एका जाहिरातीत, 'आला! सख्या महार देगावकर आला! आता फार गंमत होणार आहे!' असं आजच्या हिंदी चित्रपटातल्यासारखं गंमतीचं सरळसोट आश्वासन आहे. एक बालगंधर्वांचं जर्मनीत प्रिंट केलेलं छायाचित्र आहे. नऊवारी साडी, पण पायात बूट, मनगटाला घड्याळ, हातात पुस्तकं, पर्स आणि ही भलीमोठी छत्री. डोळ्याला बारीक फ्रेमचा चष्मा, फोटोचं शीर्षक 'बाल गंधर्व अॅज अ कॉलेजलेडी!' हॅम्लेटच्या भूमिकेत नानासाहेब फाटक आणि बेंजामिननं वापरलेल्या तरवारी अशा काही ऐतिहासिक झोकात मांडल्या आहे की, जणू हॅम्लेट कुणी खराखुरा राजपुत्र होता आणि त्यानं स्वत: त्या वापरल्या असाव्यात! गोव्यामध्ये रंगमंच म्हणून एक फिरता गाडा वापरला जात असे. इंग्रजी रंगभूमीच्या सुरुवातीच्या काळात तिथंही रंगमंचाचं स्वरूप अगदी हेच होतं. ◻

## ◻ भद्रावती ग्रामोद्योग संघ : नव्या जीवनाची घडण

'मराठी रंगभूमी आणि भारतीय रंगमंचाचं' हे प्रदर्शन म्हणजे देशमुखांच्या परिश्रमातून उभा राहिलेला एकखांबी तंबू होता; तर मागच्या आठवड्यात जहांगीर आर्ट गॅलरीत भरलेलं सिरॅमिक्सचं प्रदर्शन म्हणजे 'बिना सहकार नही उद्धार'चं मूर्तिमंत उदाहरण. भद्रावतीच्या ग्रामोद्योग संघाचे उत्साही अध्यक्ष कृष्णमूर्ती मिरमिरा आणि संघातल्या कुंभारांनी भरवलेलं हे प्रदर्शन म्हणजे त्यांच्या अनेक वर्षांच्या तपश्चर्येचं फळ. अगदी मीठ-चटणीच्या सट-बरण्यांपासून ते झुलत्या कुंड्या, पुष्पपात्रं, बाउल्स, डिशेस, राजण अशा शोभेच्या वस्तूपर्यंत सारं काही प्रदर्शनात होतं. आधीच सिरॅमिक्स म्हणजे खानदानी रुबाब! त्यात या साऱ्या वस्तूवर झुलणाऱ्या किंमतीच्या वजनदार लेबलसनी त्या अक्षरश: 'प्रेक्षणीय' बनल्या होत्या! काही भल्या मोठ्या पुष्पपात्रांवर आणि अर्नेस् वर 'सोल्ड एअर इंडिया' किंवा 'सोल्ड: हॉटेल ताजमहाल' अशा चिठ्ठ्या सहज दिमाखात लटकत होत्या.

पण नाविन्य होतं ते या प्रदर्शनात नाही तर प्रदर्शनामागच्या इतिहासात. ग्रामोद्योग संघ वर आणण्यासाठी मिरमिरांनी जी काही धडपड केलेली आहे ती खरोखरच भन्नाट आहे स्वत: मिरमिरा जपान-इंग्लंडमधून कुंभारकामाचं कुशल कलाशिक्षण घेऊन आले होते. तेव्हा आपल्या या ज्ञानाचा फायदा कुंभारांना मिळावा म्हणून ते चांदा जिल्ह्यातल्या भद्रावतीला येऊन स्थायिक झाले. गाव इतर चार गावासारखंच. एक गाव आणि अनेक पाणवठे. जोडीला गरिबी, अस्वच्छता, अन्याय, विषमता, अज्ञान हे सारं होतंच. गावात कुंभार बहुसंख्येनं. त्यांचं व्यावसायिक ज्ञान अगदीच मर्यादित. मग बाहेरच्या जगात त्यांचा निभाव कसा लागावा?

मिरमिरांनी इथं येऊन कामाला सुरुवात केली तेव्हा त्यांना निश्चित दिशा ठाऊक होती, मार्ग मात्र शोधायचा होता. अगदी संडास साफ करण्यापासून त्यानी सर्व गोष्टी या लोकांना शिकवल्या. त्यांच्या धंद्यातल्या अद्ययावत कौशल्याचं शिक्षण त्यांना दिलं. मालाच्या उत्पादन आणि विक्रीसाठी सहकारी तत्त्वावर ग्रामोद्योग संघाची स्थापना केली. हे सारं करत असताना पहिले काही महिने त्यांना गांधी स्मारक निधीतून १०० रु. मासिक पगार मिळत असे; पण पुढे काही मतभेदांमुळे तोही बंद झाला. मग कधी चणे-फुटाणे, कधी कपभर चहा, तर कधी फक्त पाणी पिऊन त्यांनी दिवस काढले. त्यांच्या या तपश्चर्येचं फळ आज केवळ त्यानाच नाही, तर त्या साऱ्या गावाला मिळत आहे. भद्रावतीचा ग्रामोद्योग संघ आता पुष्कळ विस्तारला आहे, त्याच्या शाखाही निघाल्या आहेत. संघाचा कारखाना आणि तंत्रशाळा तीन-चारशे जणांना पोटापाण्याला देतो आहे. इथल्या कामगाराना केवळ उन्हाळ्यातच नाही, तर बाराही महिने काम मिळतं. कुशल कामगारांना तर महिना हजाराहूनही अधिक कमाई होते. इथं शिक्षण घेतलेल्या कारागिरांना आणि त्यानी तयार केलेल्या मालाला भल्याभल्या ठिकाणांहून मागणी असते आणि भद्रावतीचा हा कारखाना केवळ शोभेच्या कलावस्तूच करतो असं नाही. आजूबाजूच्या कित्येक गावांची विटा-कौलाची गरज इथून भागते. विशेष असं की, हे सारं काम एकदिलानं करताना हा महार तो चाभार असं माणसं खरोखर विसरली. एकमेकांच्या मांडीला मांडी लावून बसू लागली, एकमेकांच्या घरी जाऊ लागली आपसात प्रेमानं बोलू लागली. समोर एखादा विधायक कार्यक्रम असेल, तर जाती-जमातीचे हे क्षुल्लक तपशील असं खरंच विसरता येत असतील का? मिरमिरांना आलेला अनुभव तरी फारच आशादायक आहे.

मला फार कौतुक वाटलं ते आणखी एका गोष्टीचं. कारखान्यात काम करणारे काही कुंभार-कामगार प्रदर्शनाबरोबर मुंबईला आले होते. त्या साऱ्यांच्या माना ताठ होत्या. नजरेत आत्मविश्वास होता. लाचारीची झाक नव्हती. कष्ट करून, धडपडून-पडून वर येत असलेल्याच्या चेहऱ्यांवर कधीकधी अगदी शिणले-विटलेले भाव असतात. किती तरी जणाचा आविर्भाव सदैव दीन-दुबळा आणि हात पसरलेला असतो; पण भद्रावतीचे हे तरुण मात्र अगदी सराईत निर्धारानं वागत होते. प्रवेशद्वारापाशीच एक तरुण कुंभार फिरत्या चाकावर घडा बनवायचं प्रात्यक्षिक दाखवत होता. त्याच्या हातातल्या चाकाला छान वेग आला होता आणि त्याच्या जीवनालाही!

—ललिता बर्वे

# कणा नसलेले नेतृत्व

## चव्हाणांची दीनवाणी परवड

वा. दा. रानडे

'चव्हाण-पवारांच्या पक्षांतराला आणि त्यासंबंधीच्या हालचालींना वृत्तपत्रांनी एवढी प्रसिद्धी का द्यावी ? त्यांच्या पक्षांतराने असा काय मोठा बदल होणार आहे ?' एक सेवानिवृत्त प्राध्यापक माझ्याशी बोलत होते. राजकारणात त्यांना रस नाही; पण आज राजकारणाने सारी क्षेत्रे एवढी व्यापून टाकली आहेत की ते टाळताच येत नाही ! पण त्या प्राध्यापकानी उपस्थित केलेला प्रश्न महत्त्वाचा आहे. त्या निकषावरच वास्तविक चव्हाण – पवारांच्या निर्णयाकडे पहायला हवे.

या दोन नेत्यांच्या मुलाखती, भाषणे, मुंबईची प्रदेश कॉंग्रेस कमिटीची बैठक यांचे सविस्तर वृत्तांत वृत्तपत्रात येऊन गेले आहेत. त्यांची पुनरुक्ति येथे करीत नाही; पण काही मूलभूत प्रश्नांकडे लक्ष वेधणे आवश्यक वाटते.

अशा महत्त्वाच्या प्रश्नावर निर्णय घेताना बहुमत, एकमत, की तत्त्वनिष्ठा यापैकी कोणत्या निकषाला अधिक महत्त्व द्यावयाचे ? लोकशाहीवाद्यांची भूमिका याबाबतीत कोणती असायला हवी ? बहुमताचा निर्णय आणि तात्त्विक भूमिका यात संघर्ष येतो तेव्हा बहुमताचा कौल मानावयाचा की तात्त्विक भूमिकेशी इमान राखावयाचे ? महाराष्ट्र प्रदेश अर्स कॉंग्रेसचे नेते, आमदार, कार्यकर्ते यांच्या बैठकात व वाटाघाटीत या प्रश्नांना फारसे महत्त्व दिले गेले आहे असे दिसत नाही.

राजकीय पक्षांची उभारणी विशिष्ट तात्त्विक भूमिकेवर झालेली असते. श्रीमती इंदिरा गांधींनी १९७८ च्या सुरुवातीस कॉंग्रेसमध्ये फूट पाडून इंदिरा कॉंग्रेस हा आपला वेगळा पक्ष स्थापन केला. १९७७च्या निवडणुकीतील पराभवानंतर जवळजवळ नऊ महिन्यांनी इंदिरा गांधींनी हा निर्णय घेतला. कॉंग्रेस कार्यकारिणीत आणि अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीत त्या वेळी इंदिराविरोधकांचे बहुमत होते. लोकशाही मार्गाने पक्षाची सूत्रे आपल्या हाती आणण्याची शक्यता त्यांना दिसत नव्हती म्हणून बंडखोरी करून आपल्या अनुयायांचा त्यांनी वेगळा पक्ष काढला. हा उघडउघड इंदिरा-समर्थकांचा पक्ष होता.

एकाधिकारशाहीला विरोध, सामुदायिक नेतृत्व आणि पक्षांतर्गत लोकशाही कार्यपद्धती ही तत्त्वे मानणारा आणि महात्मा गांधी व नेहरूंची परंपरा पुढे चालविणारा पक्ष आमचाच, असा दावा या वेळी इंदिरा कॉंग्रेसमध्ये सामील होण्याचे नाकारणाऱ्या स्वर्णसिंग, यशवंतराव चव्हाण आदि नेत्यांनी केला; पण यातली तात्त्विक भूमिका म्हणजे इंदिरा कॉंग्रेसपासून आपला वेगळेपणा दर्शविण्यासाठी उभा केलेला तात्त्विक डोलारा होता. या तत्त्वावर या नेत्यांची कधीच मनापासून निष्ठा नव्हती. १९७८ च्या विधानसभा निवडणुकांत इंदिरा कॉंग्रेसने कर्नाटक व आंध्रप्रदेश ही दोन राज्ये जिंकली आणि महाराष्ट्र कॉंग्रेसवरील चव्हाण वर्चस्वाला खिंडार पाडत जवळजवळ चव्हाण कॉंग्रेसएवढ्याच जागा इंदिरा कॉंग्रेसने मिळविल्या. महाराष्ट्रात दोन कॉंग्रेसपक्षाच्या अघाडीचे सरकार काही काळ अधिकारावर आले तेव्हाच या नेत्यांची तत्त्वनिष्ठा किती तकलुपी आहे हे दिसून आले; पण जनता पक्षाच्या नेत्यांनी पवारांना मुख्यमंत्रिपदाचे आश्वासन दिल्यावर त्यांचा गट सरकारमधून बाहेर पडला आणि जनता व इतर मित्रपक्षाच्या पाठिंब्याने त्यांनी पुलोद सरकार स्थापले. जनता पक्षाचा पाठिंबा घेऊन पवारांनी सरकार स्थापणे चव्हाणांना पसंत नव्हते; पण मंत्रिपद मिळण्याची संधी येताच स्वत: चव्हाणांनी तरी पुढे काय केले ? जनता पक्षातल्या फुटीने मोरारजी मंत्रिमंडळ गडगडल्यानंतर लोकदलाचे नेते चरणसिंग यांनी अर्स कॉंग्रेसच्या पाठिंब्याने मंत्रिमंडळ बनविले तेव्हा चव्हाणांनी त्यात उपपतप्रधानपद स्वीकारले. सत्तेच्या मोहापुढे तत्त्वनिष्ठा ढासळते तेव्हा तत्त्वनिष्ठेच्या बाबतीत चव्हाण व पवार यात तरतम करण्याचे काही कारण नाही.


### नवीन दाखल झालेली पुस्तके

१. बर्ट्रांड रसेल–( चरित्र ) सु. वा. बखले
२. जॉर्ज बर्नार्ड शॉ–( चरित्र )–वि. ह. कुलकर्णी
३. अग्निवेल–( लेखसंग्रह )–पु. भा. भावे
४. य. गो. जोशी : व्यक्ती व वाङ्मय–सुनन्दा दास
५. मानव आणि मार्क्स–प्रभाकर पाध्ये

**ENGLISH**

1. **The Snake**–( A thriller on the reptile )–John Godey.
2. **Extraterrestrial Civilizations**–( Cosmology )–Isaac Asimov.
3. **Ninja**–( Novel–Bestseller )–Eric Von Lustbader.
4. **Random Winds**–(Bestseller–A novels of doctors)–Plain Belva.
5. **Congo**–( Bestseller–African Treasure Hunt–Adventure )–Michael Crichton.

* At Phoenix, thousands of books cry out for a decent living. That needs a tidy sum. So do not take it ill if you are asked to pay your dues in time !

**फिनिक्स लायब्ररी**

७२७ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

'मी एकटा राहिलो तरी चालेल; पण तत्त्वद्रोह करणार नाही !' अशा स्वरूपाचे उद्गार चव्हाणांनी एकदा काढले होते; पण आता बिनशर्त इंदिरा काँग्रेस-प्रवेश करताना या उद्गारांचा त्यांना सोयिस्कर विसर पडला आहे !

प्रभावी पक्ष म्हणून गेल्या तीन वर्षांत अर्स काँग्रेस उभी राहूच शकली नाही. कणा नसलेला पक्ष अशीच या पक्षाची प्रतिमा जनमनात ठसली. या पक्षाला काही भवितव्य नाही हे ज्यांनी आधीच ओळखले त्या वसंतदादांचा गट इंदिरा काँग्रेसला यापूर्वीच मिळाला; पण इंदिरा काँग्रेस हाच मुख्य प्रवाह असल्याचा साक्षात्कार चव्हाणांना एवढ्या उशीरा का झाला ? वास्तविक जानेवारी १९८० च्या लोकसभा निवडणुकीतच जनतेने इंदिरा गांधींच्या बाजूने कौल दिला. जनमनाचा कौल मानायचा तर चव्हाणांनी त्या वेळीच इंदिरा काँग्रेसमध्ये सामील व्हावयास हवे होते. दीड वर्ष ते कशासाठी थांबले ? की इंदिरा सरकारबद्दल भ्रमनिरास होऊन पुनः इंदिराविरोधाची लाट येईल व त्याचा फायदा आपणास घेता येईल असे त्यांना वाटत होते ? त्यांचे आडाखे चुकले ! इंदिरा सरकारविरुद्ध जनतेत असंतोष असला तरी इंदिरा काँग्रेसला प्रभावी पर्याय उभा करण्यात विरोधी पक्ष अयशस्वी ठरले आहेत त्यामुळे जनता अगतिकपणे इंदिरा गांधी यांच्या व इंदिरा काँग्रेसच्याच मागे आहे. पुढच्या निवडणुकीपूर्वी पक्षात महत्त्वाचे स्थान मिळवायचे असेल तर पक्षात आताच प्रवेश करायला हवा. आणखी उशीर केला तर संधी हातची गेलेली असेल, या विचारानेच चव्हाणांना इंदिरा काँग्रेसप्रवेशाची घाई झालेली दिसते.

आपली आतापर्यंतची भूमिका, धोरणे चुकली असे प्रामाणिकपणे वाटले तरी चुका दुरुस्त करण्याचा हक्क प्रत्येकाला आहे; पण तसे करताना लोकशाही पद्धतीने जाण्याचा पायंडा जबाबदार नेत्यांनी पाळायला हवा. पक्षाची तात्त्विक भूमिका, धोरण, कार्यक्रम याबाबत बहुमताने होईल तो निर्णय सर्वांनी मान्य करावयाचा, आपले मत वेगळे असले तरी जाहीरपणे पक्षाच्या अधिकृत धोरणाचा पुरस्कार करावयाचा, पण पक्षांतर्गत पातळीवर विचारविनिमयाने सभासदांचे मतपरिवर्तन करून त्यांना आपल्या बाजूला वळविण्याची मोकळीक अल्पमतवादी गटाचे सभासदांनाही असायला हवी, हीच खरी पक्षांतर्गत लोकशाही कार्यपद्धती. आपल्याकडे या पद्धतीने पक्षबांधणी झालीच नाही.

पक्षाच्या भवितव्यासंबंधीच महत्त्वाचे निर्णय घेतले जातात तेव्हा त्याबाबतीत अंतिम अधिकार पक्षाच्या अखिल भारतीय समितीलाच असले पाहिजेत, कार्यकारिणीला नव्हेत आणि प्रदेश समितीला तर मुळीच नव्हेत.

निर्णय बहुमताने घेणे चांगले की एकमताने घेणे चांगले ? याबाबतीत एक लक्षात घेतले पाहिजे की, एकमताने निर्णय हे खऱ्या अर्थाने एकमताचे नसतात. बहुमतवाल्या गटाचे भूमिकेस अल्पमतवाल्या गटाने पाठिंबा द्यावा असे दडपण त्या गटावर आणले जाते. त्याने ते ऐकले तर एकमताने निर्णय होतात; नाही ऐकले तर बहुमताने होतात; पण एकमतापेक्षा किंवा बहुमतापेक्षा अधिक महत्त्व तात्त्विक भूमिकेचे मानायला हवे. पक्षाची तात्त्विक भूमिका म्हणजे त्याचा प्राण ! तोच गमावला तर पक्षाच्या नुसत्या सांगाड्याला काय अर्थ ? पण असे तत्त्वनिष्ठ नेते व कार्यकर्ते मिळणेच अलीकडे दुर्मिळ झाले आहे.

शेवटी त्या प्राध्यापकाने उपस्थित केलेल्या प्रश्नाकडे पुनः वळतो. चव्हाण–पवारांचा गट इंदिरा काँग्रेसला मिळाल्याने परिस्थितीत असा काय मोठा बदल होणार आहे ? इंदिरा गांधींच्या नेतृत्वाशी लढत देऊन इंदिरा काँग्रेसला वेगळे, चांगले वळण देण्याचे सामर्थ्य या दोन्ही नेत्यांमध्ये नाही. इंदिरा गांधी देतील ते स्थान पत्करूनच त्यांना त्या पक्षात दीनवाणेपणाने रहावे लागणार आहे.

इंदिरा काँग्रेस प्रवेशासाठी यशवंतराव चव्हाणांना आणखी महिनाभर ताटकळत बसावे लागणार आहे. संसदीय मंडळाच्या दिल्लीस झालेल्या २० जूनच्या बैठकीत या प्रश्नावर मतभेद झाले आणि निर्णय कार्यकारिणीकडे सोपविण्यात आला. कार्यकारिणीची बैठक एक महिन्यात होईल. वास्तविक हा निर्णय इंदिरा गांधींनीच घ्यावयाचा आहे. चव्हाण प्रवेशाबाबत त्यांनी आपले स्पष्ट अनुकूल मत दर्शविले असते तर २० जूनच्या संसदीय मंडळाच्या बैठकीतच निर्णय झाला असता; पण चव्हाणांना दीनवाणेपणाने वाट पहायला लावायची संधी त्या कशाला दवडतील ? पहा तुमच्या प्रवेशाला आमच्या पक्षातल्या कार्यकर्त्यांचा विरोध आहे; पण मीच तुम्हाला मोठ्या मनाने प्रवेश देत आहे असे एकूण वातावरण त्यांना निर्माण करावयाचे आहे, असे दिसते. □



## उत्तरमीमांसा : ११ :

स. शि. भावे

# ग्रामीण आणि दलित विद्यार्थ्यांचे भयानक पोरकेपण

गेल्या आठवड्यात ( उत्तरमीमांसा : १० ) शैक्षणिक नियोजनाचा तात्त्विक विचार केला आणि एक आठ कलमी योजना संबंधितांच्या विचारासाठी मांडली.

आज काही व्यावहारिक अडचणी वाचकांना सांगायच्या आहेत. विशेषत: दलित आणि ग्रामीण विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयांतील अडचणी सांगायच्या आहेत.

दलित विद्यार्थ्यांना, आर्थिक दृष्टीने मागासलेल्या विद्यार्थ्यांना आज काही थोड्या सवलती मिळतात. या सवलतीबाबतही काहींच्या मनात तक्रार, तर इतर काहींच्या मनात शंका-आशंका आहे. वस्तुस्थिती मात्र अशी आहे की, सध्या असलेल्या सवलती मर्यादित आणि अपुऱ्या आहेत. या सवलतींनी शैक्षणिक मागासलेपणा दूर होण्यासाठी पुरेशी मदत मिळू शकत नाही. आज १९८१ साली देखील, दलिताचे आणि ग्रामीणाचे शैक्षणिक मागासलेपण भयानकपणे चहूबाजूंनी घेरणारे आहे.

¤

विद्यार्थ्यांना आपल्या शैक्षणिक उपक्रमात पालकाची मदत हवी असते. शाळेच्या टप्प्यातून बाहेर येऊन कॉलेजातील उच्च शिक्षणाचा टप्पा पचवायचा हेच मुळी कठिण असते. या बदलाच्या काळात पालकाची मदत-व्यावहारिक, शैक्षणिक आणि भावनिक-अशा तीनही अंगांनी लागत असते.

ग्रामीण, दलित पालक ही मदत कोणत्याच अंगाने देऊ शकत नाहीत. या पालकांना स्वत:च्या मुलांचे शैक्षणिक पोरकेपण दूर करता येत नाही.

मला दोन दृश्ये आठवतात.

एक . बंगल्याच्या दारात सुबक मोटरगाडी हंसासारखी हलकेच येऊन थांबते. पपा, ममी, आणि राजू उतरतात. चपळाईने, तरतरीतपणे. बंगल्यात शिरल्याबरोबर सफाईदार 'गुड मॉनिंग'. 'नाव्, धिस इज राजू. राजू, धिस इज युअऽ प्रिन्सिपल' अशी क्रॅकजॅक बिस्किटांसारखी कुरकुरीत 'इंट्रो' होते. प्रिन्सिपलसाहेब प्रसन्न होतात. 'दोज वेअऽ द डेज' अशी एकमेकांच्या 'कंटेपररीज्' ची चौकशी होते. 'डोन्च्यू वरी ओल्ड बॉय' असा पपांना दिलासा मिळतो. पपा-प्रिन्सिपल एकाच सांस्कृतिक परंपरेत भिजलेले. या समान सांस्कृतिक कोशाचा आधार त्यांना एकमेकांना आणि मुख्य म्हणजे राजूला मिळतो, मिळत राहतो. आधाराची ही ऊब सवलतीच्या पैशांनी विकत घेता येण्यासारखी नसते.

दोन : प्रिन्सिपलसाहेब खिडकीतून बघत असतात. एक विद्यार्थी कावराबावरा बघत येत असतो. भितऱ्या सशासारखा. अंगात पँट, मॅनिला. त्यांची गावाकडची शिलाई ओळखू येते. चाल गावाकडची, अडखळती असते. बंगल्याशी आल्यावर व्हरांड्याच्या पायऱ्यांशी तो पाच मिनिटे घुटमळतो. मग पायऱ्या चढतो. चार पावले चालून दाराजवळ येतो. हलकेच टकटक करतो. तोंडातून अस्फुट हाक, 'सर ! सर !'

व्हरांड्याच्या बाहेर, जमिनीपासून अवघ्या चार फुटावर बेल असते. ती न वाजल्याने आणि दारावर टकटक झाल्याने सर अस्वस्थ झालेले असतात. ते दार उघडतात. स्वत:च अर्धे बाहेर येतात. विचारतात, 'बेल नाही का वाजवायची ?' हे विचारताना, त्यांच्या स्वत:च्या मताने त्यांनी अती मायेचा आवाज काढलेला असतो, पण विद्यार्थी घाबरतो.

"दिसली नाही, सर." त्याचा घाबरट आवाज.

"एवढी बेल नाही दिसली ? मग पुढं कॉलेजात कसं काय होणार ?" विनोदबुद्धीने सर खो खो हसतात.

विद्यार्थ्याला विनोद उमगत नाही. तो ओशाळे हसतो. त्याचे आधीच अडखळते बोलणे, ते अधिकच अडखळते होते. काय विचारायला आलो होतो हेही तो अर्धेमुर्धे विसरतो.

¤

नवधनाढ्य वातावरणातून येणारे मोजके विद्यार्थी सोडले तर उरलेल्या सर्व ग्रामीण व दलित विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा हा ओशाळेपणा शिक्षण संपेपर्यंत कायम राहतो.

हा ओशाळेपणा ज्या पोरकेपणातून आलेला असतो तो सांस्कृतिक पोरकेपणा केवळ आर्थिक सवलतींनी, चार-सहा वर्षांत दूर होत नाही.

त्याच्या या पोरकेपणाला तो किंवा त्याचे आई-वडील, किंवा त्याचे कुटुंब-हे जबाबदार असतात. जबाबदार असते ती एक परंपरा, विषमतेची आणि शोषणाची प्रदीर्घ परंपरा.

या विद्यार्थ्यांच्या घरी वीज नसते. मग टेबल, टेबलावर खास टेबललॅम्प कसा असणार ? घरच नसते. मग 'स्टडी' कशी असणार ! सर्व नातेवाईक अशिक्षितच नव्हे तर निरक्षरही असणार ! मग त्याला सुशिक्षित-सुसंस्कृत पालकाचा खास 'गायडन्स' कसा मिळणार ! वृत्तपत्रे, अभ्यासपूर्ण नियतकालिके, निरनिराळ्या क्षेत्रात प्रावीण्य मिळवून सहजपणे त्यांची माहिती देणारे 'अंकल्स'-हा सारा कोश त्याच्या भोवती शैक्षणिक ऊब द्यायला कसा असणार ?

ज्यांना हे सारे मिळालेले असते ते सहजच म्हणणार-आणि म्हणतात-की आम्हाला हे सारे सारे मिळाले आहे, हा काय आमचा दोष ? उत्तर असे की, हा जसा यांचा दोष नाही, तसा तो खास गुणही नव्हे. म्हणून खास गुणाचे जसे फायदे मिळतात, तसे या गुणाचे वा अनुकूलतेचे, मिळणे रास्त नाही.

पण हे फायदे सुदैवींना मिळतात. परंतु स्वत:चा कोणताही दोष नसताना, विशिष्ट जातीत व परिस्थितीत जन्माला आले म्हणून जे दलित किंवा ग्रामीण, अशा दुर्दैवी विद्यार्थ्यांना हे फायदे आणि हा पुढावा मिळत नाही.

पुढावा मिळालेल्यांना मात्र वाटत असते : सवलती दिल्या ना. मग आता या दुर्दैवी मागासलेल्यांनी बरोबरीने आपला मुकाबला करावा. हजार वर्षांची, मागासलेपणाच्या परंपरेची बेडी चार-सहा वर्षांत तोडावी, आणि बरोबरीने धावू लागावे, धावून दाखवावे.

असे होणार नाही. कारण असे होत नसते.

सवलतीचे, राखीव जागाचे, स्वरूप काळाप्रमाणे बदलू शकेल किंवा बदलावे लागेल. पण पुढावा मिळालेल्यांनी, तो न मिळालेल्यांना खास संरक्षित अधिकाराचे वातावरण देणे हे येती पन्नास वर्षे तरी आवश्यक राहील. मागासलेल्यांचा तो हक्क असेल. पुढारलेल्यांचे ते कर्तव्य असेल.

आज शिक्षणक्षेत्रात, हे संरक्षित अधिकाराचे वातावरण द्यावयाचे म्हणजे नक्की काय करायचे ?

¤

पुन्हा दोन प्रसंग आठवतात.

एक :

स्थळ : कॉलेजची कचेरी. पात्रे : दलित विद्यार्थी आणि लेखनिक.

: सर (पुन्हा थाबून) सर...

: ( मान वर न करता, त्रासिक आवाजात ) काऽऽय ?

: सर, माझा ' बीसी 'चा अर्ज...

: ( वर न बघताच अर्ज खसकन् ओढून घेत ) हं ! बघू.

: ( ओशाळवाणा ).

: हा अर्ज चालणार नाही. घेऊन जा !

: पण का सर ?

' लेट आहे. तारीख टळून गेली !

: दाखला आणण्यात लेट झाला सर. (त्या दाखल्यासाठी त्याला दहा रुपये मोजावे लागलेले असतातच. कारण, 'सवलती हव्यात ना, घ्या तर '.)

: लेट का झाला ते तुझं तू बघ. मला काय तेवढंच काम आहे की काय? जावई झालेत नुसते सगळे. आठ दिवस आधी नोटीस लावली होती. वाचली नाहीस का ?

: वाचली होती सर; पण नीट कळली नव्हती.

: कशी कळेल ? नोटीस इंग्रजीत होती ना ? अरे, नाही आपल्याला इंग्रजी येत तर येता कशाला मोठ्या कॉलेजात ? ( अध्यापनाचे माध्यम मराठी झालेले असले तरी व्यवस्थापनाचे माध्यम इंग्रजीतच असते. त्याचा पुरेपूर अभिमान लेखनिकाच्या बोलण्यात भरलेला असतो. त्याच मोठेपणात, शेजारीच उगवलेल्या लेखनिकाला उद्देशून ) सी. दीज अन्फॉर्च्युनेट चॅप्स. दे ईव्हन डोण्ट नो टु सिलेक्ट द प्रॉपर कॉलेज. आय रियली वरी. व्हॉट टु बिकम ऑफ देम ? ( दीडशे वर्षे इंग्रजी शिक्षणपरंपरेचा वारसा म्हणजे हे शेवटचे वाक्य. )

' येता कशाला ? ' या स्वागताने विद्यार्थी अधिकच ओशाळतो. दहावीतले ५९ टक्के गुण उपयोगी पडत नाहीत हे त्याच्या लक्षात येते.

उपप्राचार्यांच्या कचेरीसमोरील रांगेत तो उभा राहतो. नंबर येतो तेव्हा वेळ संपलेली असते. कचेरीच्या बाहेर पडताना मुलाकडे बघून उपप्राचार्य 'फर्चसली' हसतात, ' वेल, टुमारो ' असं सिगरेटदग्ध ओठातून डौलदारपणाने बोबडतात आणि अंतर्धान पावतात !

विद्यार्थी परततो.

पण कुठे ?

दृश्य दुसरे :

स्थळ : कनवाळू प्राध्यापकाचे घर.

विद्यार्थी : तोच.

: अरे असा बाहेर का उभा ? आत ये ना. ये, बस हं. काय हवं तुला ?

: ( भारावलेल्या आवाजात ) जागेची काही सोय होईल का ?

: ( उत्साहाने ) होस्टेल हवं का तुला ? शिफारस देतो मी. चागले मार्क आहेत ना तुला. काम होईल तुझं.

: होस्टेल नको सर.

: का ? भाडं माफ करवून घेऊ आपण.

: तसं नाही सर. होस्टेलच्या खोलीत स्वयंपाक करता येत नाही. एकटधा-एकटधानं क्लब किंवा खानावळ परवडत नाही. आम्ही चारजण एका खोलीत राहू म्हणतो. एकाचा डबा येणार आहे गावाकडनं. उरलेला एकत्र स्वयंपाक केला की हलकं जाईल.

: डबा वेळेवर येतो का रे ? ( एकूण ' समस्या ' आपल्या आवाक्याबाहेरची आहे हे ओळखून सरांनी कनवाळूपणाची गाडी दुसऱ्या रुळावर नेली होती. )

: कधी येतो, कधी नाही. कधी रिकामादेखील.

: रिकामा ?

: एसटीत कुणी कुणी रिकामाही करतात. पावसाळघात गाडी अडली की दोन दोन दिवस पण डबा भेटत नाही.

: (कनवाळूपणाचा जरा जास्तच फायदा घेतला जातोय म्हणून अस्वस्थ, म्हणून प्रसन्न हसत) आता बाहेरची खोली मी रे कशी सागणार ? मी तर आपला प्रोफेसर !

:(प्रोफेसरांच्या बंगल्यातील दोन मोकळ्या खोल्यांकडे ह्याचे लक्ष जात असते. त्याच्या नजरेकडे सराचे लक्ष जाते. ते अवघडतात. समजा दिली खोली या चौघांना तर–त्यांचा कनवाळूपणा उदात्ततेच्या पातळीला स्पर्श करतो. उदात्ततेचा आवंढाच त्यांना येतो. तेवढ्यात आठवते– जाणवते –स्वयंपाक, म्हणजे धूर. अस्वच्छता. शिवाय त्यांचे मित्र येतील. पालक येतील. गाववाले येतील. कल्पनेने सर विव्हळ होतात. उदात्ततेचा पूर झटकन ओसरतो.' तसा तो झटकन ओसरला याने त्यांना सूक्ष्मसे समाधान वाटले. ते तटकन मुलाखत संपवतात–पण गोडव्याने) अरे हो. मला मिटिंग आहे. तू असं कर. उद्या भेट मला. हं ! (या ' हं 'च्या उच्चाराला वात्सल्याचा गाढ स्पर्श. स्वतःच्या समयसूचक अभिजात वर्तनाचा सरांना चक्क अभिमान वाटतो.)

विद्यार्थी माघारी वळतो. तिथे उद्या. येथेही उद्या. पण आज कोठे जायचे ?

¤

सवलती किती पोकळ ठरतात !

या पोरक्या विद्यार्थ्यांना, या सामाजिक अपंगाना, जे पोषक वातावरण हवे आहे ते देणे अशक्य आहे काय ? आणि ते कोणी द्यायचे ?

ते अशक्य तर नाहीच. ते कोणी द्यायचे तेही स्पष्ट आहे.

ही जबाबदारी प्रथमतः कॉलेजाची आहे. आम्हा प्राध्यापकांची आहे.

प्राचार्य कोगेकराच्या हाताखाली तेव्हा मी एक नवखा प्राध्यापक होतो. सध्याच्या बारावीऐवजी तेव्हा प्री-डिग्रीचा वर्ग होता. ह्या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी प्राचार्य कोगेकरांनी एक योजना आखली होती. प्री-डिग्रीचे ८०० विद्यार्थी ४० प्राध्यापकात विभागून दिले होते. आपल्या गटातील वीस विद्यार्थ्यांना प्राध्यापकाने आठवड्यातून

एकदा एक तास भेटायचे. त्यांच्याशी गप्पा करायच्या. त्यांची सर्वांगीण ओळख करून घ्यायची. त्यांच्याबरोबरीने आणि सहकार्याने छोटीशी योजना ठरवून ती पार पाडायची. तो त्यांचा खास 'आपला' शिक्षक. ते त्याचे खास 'आपले' विद्यार्थी.

अशा तीन वर्षी माझ्या विसाविसाच्या तीन तुकडया झाल्या. सर्व प्रकारच्या अडचणी घेऊन विद्यार्थी यायचे. आम्ही सारे एकवीस जण मिळून त्या सोडवायचे. आम्ही सारे एकमेकाचे घट्ट मित्र झालो. अजूनही तसे आहोत. अजून भेटलो की 'त्या' आठवणी निघतात.

का कोण जाणे, नंतर ती योजना बारगळली. अनेक प्राध्यापकाना 'हा' जादा तास नकोसा झाला होता, असे बोलले जात असे. नंतर सुमारे दहा वर्षांनी डॉ. व. अ. पुणतांबेकरानी वसतिगृहातील विद्यार्थ्यांचा एक 'मिडनाइट क्लब' चालवून पाहिला. 'साहित्य सहकार' मुळेही एक प्रकारची कुलभावना गेली चाळीस-बेचाळीस वर्षे तयार होत आहे.

पण हे झाले तुरळक आणि मर्यादित प्रयत्न. सामाजिक अपंगांना सामाजिक ऊब देण्याचे कार्य अशा प्रयत्नांनी पूर्ण होणारे नाही. (गेल्या उत्तरमीमांसेत सुचविल्याप्रमाणे) दर पाचशे/हजार विद्यार्थ्यांसाठी अशा मापाने विद्यार्थी-कल्याण-अधिकारी students welfare officers नेमून कॉलेजानी, ग्रामीण आणि दलितांचे पोरकेपण, योजनाबद्ध व कालबद्ध कार्यक्रम स्वीकारून नाहीसे केले पाहिजे. यंदाचे वर्ष आंतरराष्ट्रीय अपंग वर्ष आहे. शैक्षणिक क्षेत्रात यंदा अशी योजना सुरू करणे औचित्यपूर्णही होईल. सांस्कृतिक व युवककल्याणमंत्री जयंतराव टिळक यांच्या पुढाकाराने अवघड घाटरस्ता अवघ्या वर्षभरात होतो. तर मग ही योजना का यशस्वी होणार नाही ? आंतरराष्ट्रीय समाजकल्याण संघटनेची मदत या कामी मिळू शकेल. सरकारने एखादा 'युवक-कल्याण आयोग' नेमल्यास त्याला या आंतरराष्ट्रीय संघटनेचे संघटनात्मक मार्गदर्शन मिळू शकेल.

महाविद्यालयांनी आणि प्राध्यापकांनी मनावर घेतले तर त्यांनाही या दिशेने कार्य सुरू करता येईल. सध्या कॉलेज व विद्यापीठ हे काम अंगावर घेत नाहीत म्हणून 'विद्यार्थी सहायक-समिती' किंवा 'सिंबायोसिस' यांसारख्या संस्था असे सेवाभावी कार्य करीत आहेत. या संस्थांच्या ध्येयवादात राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व राष्ट्रसेवा दल या सारख्यानी आपला ध्येयवाद जुळवला तर असे कार्य जोमाने उभ राहील.

दलित आणि ग्रामीण विद्यार्थ्यांचा पोरकेपणा दूर होणे ही आजची जास्तीत जास्त महत्वाची आणि निकडीची सामाजिक गरज आहे. या विद्यार्थ्यांना आपलेपणाची ऊब जर मिळाली तर परस्परांसबधी अविश्वास आणि संशय बाळगणाऱ्या नव्या चिरफळ्या या समाजाला ग्रासतील. सर्व भारतीय समाज एकरस करण्याचे आपले स्वप्न–त्याला आणखी तडे जातील. करिता, आजच त्वरा केली पाहिजे! □

---

अवती-भवती । शरद कृष्णन्

## □ पोटनिवडणुकांचे कौल काय सांगतात ?

लोकसभेच्या सहा आणि विधानसभेच्या २३ जागासाठी झालेल्या पोटनिवडणुकामध्ये एक पश्चिम बगालचा अपवाद वगळता इंदिरा कांग्रेसने नेत्रदीपक यश मिळवून कोणत्या का कारणाने होईना, परंतु जनतेचा आपल्यालाच पाठिंबा आहे, हे निर्विवादपणे सिद्ध करून दाखवले आहे. प. बंगालमधील विधानसभेच्या पोटनिवडणुका तसेच तेथील श्रीरामपूर लोकसभा मतदारसंघामधील पोटनिवडणूक राज्यामध्ये सत्तेवर असलेल्या मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या दृष्टीने अतिशय महत्वाची होती. या निवडणुकीमध्ये त्या पक्षाने जे यश मिळविले ते लक्षात घेता उरलेला वर्षभराचा कालावधी आता मार्क्सवादी शासनास बहुधा निर्वेधपणे पार पाडता येईल. केरळ व प. बंगालमधील मार्क्सवादी शासनाबद्दल इंदिरा कांग्रेसचा दृष्टिकोन विशेष ताठर आहे. शक्य झाले तर या दोन्ही राज्यामधून मार्क्सवाद्याना हुसकावून लावण्याचा इंदिराजींचा मानस आहे. तसे फतवे काढून राज्यसरकार सत्ताभ्रष्ट करता येणार नाही असे नव्हे, परंतु तसे करण्यात केंद्र शासनाचा अनुदार दृष्टिकोन स्पष्ट होत असल्याने काही चागले निमित्त करून ज्योती बसू आणि कपनीला घरी बसवता आले तर ते इंदिरा कांग्रेसला आणि अर्थातच त्याच पक्षाच्या केंद्र शासनाला हवे आहे. प. बंगालमधील पोटनिवडणुकीमध्ये जर मार्क्सवाद्यांना मोठे अपयश स्वीकारावे लागले असते तर आता जनतेचा या शासनाला पाठिंबा नाही, असे निमित्त करून प. बंगालमधील मार्क्सवादी शासनाला मातीत लोटता आले असते. ज्योती बसू सरकारचा एक वर्षाचा बाकी कालावधी आता बहुधा निर्वेधपणे पार पडेल. प. बंगालमधील विधानसभेच्या पोटनिवडणूक निकालावर दृष्टिक्षेप टाकला असता मार्क्सवादी शासनाने आपली परिस्थिती बऱ्यापैकी सावरून धरली आहे हे नाकारता येणार नाही. देशातील इतर भागामधील वारे प. बंगालपर्यंत पोचू शकत नाहीत, हेच मतदान ज्या पद्धतीने झाले त्यावरून सिद्ध होते. जाधवपूर, डमडम, कुमारगंज व मैकताळ येथील विधानसभेच्या जागा मार्क्सवाद्याना जिंकता आल्याने राज्यशासनाला मजबुती लाभली आहे. याच पक्षाचा श्रीरामपूर लोकसभा मतदारसंघामधील विजय विशेष महत्त्वपूर्ण मानावा लागेल. विशेषत:, लोकसभेच्या एकूण सहा मतदारसंघामध्ये झालेल्या पोटनिवडणुकांपैकी पाच निकाल इंदिरा कांग्रेसला अनुकूल गेले असताना प. बंगालमधील लोकसभेची एकमेव जागा जिंकून दाखवून मार्क्सवाद्यानी मोठीच बाजी मारली आहे. राष्ट्रीय पातळीवरील अन्य पक्षाना जे जमले नाही ते मार्क्सवाद्यानी प. बंगालमधील श्रीरामपूर मतदारसंघामध्ये करून दाखवले आहे. श्रीरामपूर मतदारसंघ हा निर्विवादपणे मार्क्सवाद्याचा बालेकिल्ला असला तरी या पक्षाचे उमेदवार अजित बाग मतदाराच्या फारसे परिचयाचे नव्हते. त्याच्यापेक्षा इंदिरा कांग्रेसचे उमेदवार शांती मोहन रॉय हे या मतदारसंघाला जास्त परिचित होते. या निवड-

णुकीमध्ये यश मिळवण्यासाठी इंदिरा काँग्रेसने शर्थीचे प्रयत्न केले होते आणि तरीही मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने जवळजवळ ९६ हजार मतांनी ही जागा जिंकून दाखवून लोकसभा पोटनिवडणुकीच्या सहा जागांपैकी ही एकमात्र जागा विरोधी पक्षाला मिळवून दिली आहे.

उ. प्रदेश व बिहार येथील विधानसभा निवडणुकांचे निकाल इंदिरा काँग्रेसला अनुकूल गेले आहेत; परंतु त्याहीपेक्षा महत्त्वाची बाब म्हणजे या विजयांमुळे या पक्षाच्या राज्यशासनाला बळकटी आली आहे. उ. प्र. चे मुख्यमंत्री तिंडवारी विधानसभा मतदारसंघातून पोटनिवडणूक लढवत होते–त्यांचा मोठा विजय अपेक्षित होता. तथापी ते मोठ्या विजयाच्या कक्षाही ओलांडून गेले असून त्यांनी तमाम विरोधी पक्षांना अक्षरशः भुईसपाट केले आहे. त्यांना ६९ हजारांहून जास्त मते पडली असून त्यांचे नजीकचे प्रतिस्पर्धी भाजपचे श्री. ब्रह्मचारी यांना केवळ ३ हजार मते पडली आहेत. लोकदलाचे रामहित यांना तर केवळ १,६७७ मते पडलेली दिसतात. आपल्या ताकदीचा टेंभा मिरवणाऱ्या या दोन्ही पक्षाची त्यांचे बलस्थान असलेल्या उ. प्रदेशात पूर्ण धूळधाण झाली आहे. लोकसभा पोटनिवडणुकीमध्ये राजीव गांधी यांनी अमेथी मतदारसंघामधून जो प्रचंड विजय नोंदवला त्याबाबतही असेच म्हणता येईल. ते विजयी होतील हे तर दिसतच होते; पण त्यांनी जो प्रचंड विजय मिळवला तो सत्ताधारी पक्षाचा मस्तवालपणा वाढवण्यास कारणीभूत ठरेल आणि विरोधी पक्षांना नैराश्याच्या खाईत लोटून देईल. अर्थात निकाल इतके प्रतिकूल गेल्यावर निवडणूक गैरप्रकाराबाबत ओरड करावीच लागते आणि भाजपचे अटलजी व लोकदलाच्या चौधरी चरणसिंग यांनी नेमके तेच केले आहे. निवडणुकीमध्ये गैरप्रकार घडत नाहीत असे नव्हे; परंतु अद्यापही त्याचे फार मोठे भांडवल करावे अशी परिस्थिती नाही.

गढवाल लोकसभा मतदारसंघाकडे साऱ्या देशाचे लक्ष होते. याच मतदारसंघातून इंदिरा काँग्रेसच्या तिकिटावर पूर्वी निवडून गेलेले हेमवतीनंदन बहुगुणा स्वतःच्या छोटेखानी पक्षाचा झेंडा घेऊन येथून निवडणूक लढवत होते. या मतदारसंघामध्ये अनेक गैरप्रकार झाल्याच्या असंख्य तक्रारी आल्याने मतमोजणी थांबवण्यात आली आणि हा मजकूर लिहीत असेपर्यंत तरी मतमोजणी झालेली नाही. बहुगुणांनीच केवळ प्रचंड बोंबाबोंब केली आहे असे नव्हे, तर याच मतदारसंघातून निवडणूक लढवणाऱ्या इंदिरा काँग्रेसच्या उमेदवाराने बहुगुणा यांच्याविरुद्ध असंख्य तक्रारी नोंदवल्या आहेत. बहुगुणा यांच्या पाळीव गुंडांनी मतपेट्या पळवून नेल्या येथपर्यंत तक्रारी नोंदवल्या गेल्या असल्याने मतमोजणी स्थगित करण्यात आली आहे. या निवडणुकीमधील पराभव बहुगुणांना परवडण्यासारखा नाही. त्यांची राजकीय कारकीर्द इतकी नरम पडली आहे की, पुन्हा झळाळी प्राप्त होणे जवळजवळ अशक्यच आहे; परंतु थोडे-फार टिकून राहायचे असेल तरीसुद्धा त्यांना गढवालमधून यशस्वीपणे बाहेर पडणे जरूर आहे आणि म्हणूनच त्यांचे शर्थीचे प्रयत्न चालू आहेत.

### बरेली व अलाहाबादमधील महत्त्वपूर्ण विजय

उ. प्रदेशमधील बरेली व अलाहाबाद लोकसभा मतदारसंघांमध्ये इंदिरा काँग्रेसने मिळविलेले विजय निश्चितपणे महत्त्वपूर्ण मानावे लागतील. बरेली मतदारसंघातून या पक्षाच्या उमेदवार बेगम अबिदा नजीकच्या उमेदवारापेक्षा ३५ हजारांहून जास्त मते घेऊन निवडून आल्या आहेत. सार्वत्रिक निवडणुकीमध्ये ही जागा लोकदलाने जिंकली होती. आता तेथून बेगम अबिदा विजयी झाल्या आहेत. अलाहाबाद मतदारसंघाबाबत विरोधी पक्ष–विशेषतः भाजप आशावादी होते. या पक्षातर्फे डॉ. मुरली मनोहर जोशी ही निवडणूक लढवत होते; परंतु त्यांना तिसऱ्या क्रमांकाची मते घ्यावी लागली. उ. प्रदेशात राज्यमंत्री असलेले के. पी. तिवारी या मतदारसंघामधून इंदिरा काँग्रेसच्या तिकिटावर ही निवडणूक लढवत होते. लोकदलाचे उमेदवार मेहबूब अहमद यांच्यापेक्षा त्यांना ४६,६८५ मते अधिक पडली. मुरली मनोहर तर त्याही पलीकडे म्हणजे तिसऱ्या क्रमांकावर गेले. याच मतदारसंघातून सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी उ. प्र. चे विद्यमान मुख्यमंत्री वि. प्र. सिंग ऱ्याहत्तर हजाराहून जास्त मतांचा पुढावा घेऊन निवडून गेले होते. राज्याचे मुख्यमंत्री म्हणून निवड झाल्यावर त्यांनी या जागेचा राजिनामा दिला होता. त्यांच्याच पक्षाने ही जागा कायम राखली आहे. मताधिक्य थोडे–फार घसरले असले तरीही हा विजय महत्त्वपूर्ण मानावा लागेल.

कटक मतदारसंघाकडे लक्ष वेधले गेले ते माजी केंद्रीय मंत्री आणि लोकदलाचे एक प्रमुख नेते श्री. रवी रे या मतदारसंघातून निवडणूक लढवत असल्याने. त्यांच्या विरोधात ओरिसाचे मुख्यमंत्री श्री. पटनायक यांच्या पत्नी सौ. जयंती पटनायक ही निवडणूक लढवत होत्या. बहुतेक सर्व विरोधी पक्षांनी श्री. रवी रे यांचा पाठपुरावा केला होता. त्यांचा पराभव झाला असला तरी निदान थोडा–फार दिलासा मिळावा इतकी मते त्यांनी मिळवली आहेत. जयंतीबाईंच्या १,५६,९०६ या मतांच्यापुढे श्री. रवी रे यांना पडलेली १,७,०५४ मतांची संख्या पराभूत उमेदवाराच्या दृष्टीनेही सन्मानित वाटावी अशी आहे. अर्थात मते जरी चांगली पडली असली तरी विजय इंदिरा काँग्रेसच्या नावाने नोंदला गेला आहे.

पोटनिवडणुकीमध्ये मतदान नेहमीच कमी होते; परंतु झालेल्या मतदानाच्या आधारे काही निष्कर्ष काढायचे असतील तर विरोधी पक्षावरील जनतेचा राग जराही कमी झालेला दिसत नाही. इंदिराजींच्या कारभाराबद्दल असमाधान वाटत असले तरी आज त्यांच्याशिवाय पर्याय नाही, हे ओळखून मतदारांनी मतदान केले आहे. अपवाद फक्त प. बंगालचा–मताचा कोट उभा करून तेथील मतदारांनी तेथील विद्यमान राज्य सरकारचे रक्षण केले आहे.

## □ राम जेठमलानी आणि मोरारजीभाई !

राम जेठमलानी–मातब्बर वकील असले तरी राजकीय नेता म्हणून काही जेठमलानी यांना फार मोठे स्थान नाही. ते संसद–सदस्य आहेत. प्रथम ते जनता पक्षाच्या लाटेवर निवडून गेले आणि नंतर अन्यत्र इंदिरा काँग्रेस विजयी झाली तरी मुंबईने जनता पक्षाचाच पाठपुरावा केल्याने पुन्हा लोकसभेवर निवडून गेले. ते ज्या भारतीय जनता पक्षाचे नेते आहेत तो पक्ष पाच–सात वर्षांत सत्तेवर येईल अशी अपेक्षा आहे. राम जेठमलानी यांना फारसा राजकीय महत्त्वा-

कांक्षा नसल्याने जनता पक्ष सत्तेवर असताना ते अनेक वेळा प्रांजळपणे आपली मते बोलून दाखवत. मोरारजीभाईंबरोबर त्यांचे अनेक वादविवाद झाले आणि प्रत्येक वेळी त्यानी आपला मुद्दा लावून धरला. प्रसंगी मोरारजीभाईंचा रोषही ओढावून घेतला. अलीकडेच संडे–मिडडेला दिलेल्या मुलाखतीमध्ये त्यांनी मोरारजीभाई पंतप्रधान असताना जे कटू अनुभव आले त्याचे मजेशीर किस्से सांगितले आहेत. मोरारजी ताठर, आपल्या भूमिकेबाबत आग्रही म्हणून तर प्रसिद्धच आहेत; परंतु ते किती कमालीचे विक्षिप्त आहेत याची झलक श्री. जेठमलानी यांनी नोंदलेल्या अनुभवावरून पहावयास मिळते. श्री जेठमलानी सागतात – मी मुबईहून निवडून आलेलो. माझ्या मतदारसंघामध्ये झोपडपट्ट्या उदंड. निवडणूकप्रचाराच्या वेळी याबाबत मी अघळपघळ आश्वासने दिली होती. ज्या ज्या वेळी मी या झोपडपट्ट्याना भेट दिली त्या प्रत्येक वेळी मी अस्वस्थ होत असे. निवडून गेल्यानंतर मी याबाबत काही तरी करणे जरूर होते. म्हणून मी त्या वेळचे पंतप्रधान मोरारजीभाई देसाई यांची भेट घेतली आणि उत्तर पश्चिम मुबईमधील झोपडपट्ट्यांबाबत काही करण्याचे सुचवले. मी म्हणालो की, या संदर्भात माझ्या मतदारांना मी आश्वासने दिली आहेत. मी असे म्हणालो मात्र. लगेच मोरारजीभाईंनी प्रतिप्रश्न केला, काय म्हणून तुम्ही आश्वासने दिलीत? त्यावर जेठमलानी म्हणाले माझ्या मतदारसंघामधील या मतदारांची अवस्था बघून मी अस्वस्थ झालो व वीज, पाणी पुरवठा, याबाबत मी जरूर काही करीन असे म्हणालो. निवडणूक उमेदवार म्हणून मी तसे बोलणे जरूर होते आणि केवळ निवडून येण्यासाठी मी तसे बोललो नसल्याने मी आपली भेट घेऊन या प्रश्नावर चर्चा करत आहे. त्यावर पंतप्रधान म्हणाले, झोपडपट्ट्यांमध्ये जाणे मानसिकदृष्ट्या तापदायक असल्यानेच मी तेथे जात नाही. मी ज्या वेळी मुंबई राज्याचा मुख्य मंत्री होतो त्या वेळी तेथे अजिबात झोपड्या नव्हत्या. मी मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी सोडल्यानंतर झोपडपट्ट्याची वाढ झाल्याने मी त्या गोष्टीला जबाबदार नाही. पंतप्रधानपदी विराजमान झालेली व्यक्ती किती आडमुठी असावी याचे उत्तम उदाहरण म्हणून वरील बातचितीचा उल्लेख करता येईल. पंतप्रधानानी अशी विक्षिप्त उत्तरे दिल्याने जेठमलानी अर्थातच नाराज झाले. जनतेचे एक सोडा, परंतु पक्षाचे कार्यकर्ते आणि नेते यांना तर बरोबर घेऊन काम करणे आवश्यक असते. लोकाना आणि आपल्याबरोबरच्या मंडळींना एकत्र घेऊन त्यांच्याकडून आपले काम करवून घेण्याच्या बाबतीत मोरारजीभाई कमालीचे अयशस्वी ठरले. एवढ्या अवाढव्य देशाचे नेतृत्व करायचे म्हणजे सहकाऱ्याना बरोबर घ्यावेच लागते. त्यांचे प्रश्न समजावून घेऊन सहानुभूतीने चर्चा करावी लागते. अनेक सामाजिक समारंभातून आपले विचार व्यक्त करावे लागतात. यानी अशा व्यासपीठाचा दारूबंदी आणि स्वमुत्र–प्रशनासारख्या गोष्टीसाठी वापर केला. अतिशय सौजन्यशील वागणूक ही या पदाची एक गरजच आहे, पण मोरारजीभाई इतके ताठर की आभाराचे अथवा कृतज्ञतेचे चार शब्द काही ते कधी बोलले नाहीत!

दारूबंदीबाबत मोरारजीभाईंची भूमिका विलक्षण ताठर होती. इतकी की या प्रश्नावरून माझे सरकार बुडाले तरी ते चालेल असे ते म्हणत असत. जेठमलानी म्हणतात, दारूबंदीची कल्पना काही वाईट नाही; परंतु या गोष्टीला प्राधान्य किती द्यायचे याचा मात्र जरूर विचार व्हायला हवा होता. ते पुढे म्हणतात, दारूबंदीबाबत मी त्यांच्याशी अनेक वेळा बोललो; परंतु आपल्या भूमिकेपासून ते काडीमात्र ढळत नसत. दारूबंदीची जी फसगत झाली त्याची आकडेवारी जरी त्यांना पुरवली तरी ते चक्क डोळेझाक करीत असत. जनता पक्षामध्ये अनेक पक्षाचे, अनेक विचारांचे लोक होते. त्याना बरोबर घेऊन जायचे तर दारूबंदीबाबत एवढी टोकाची भूमिका घेणे सयुक्तिक नव्हते. याच प्रश्नाबाबत त्यांच्याशी वाद घालताना मी त्याना म्हणालो की, आपल्या निवडणूक जाहीरनाम्यामध्ये आपण मतदाराना दारूबंदीबाबत कोणतेही आश्वासन दिलेले नाही. त्यावर मोरारजीभाई म्हणाले, नाही कसे? आपण याबाबत आश्वासन दिले आहे. त्यावर जेठमलानी म्हणाले मी वकील आहे आणि कोणत्याही गोष्टीची खातरजमा केल्याखेरीज मी बोलत नसतो. दारूबंदीबाबत आपण कोणतेही आश्वासन दिलेले नाही, हे मी त्यांना निवडणूक जाहिरनामा त्यांच्या समोर ठेवून दाखवून दिले. त्यावर त्यानी दिलेले उत्तर म्हणजे एक अजब नमुना म्हणावा लागेल. मोरारजीभाई म्हणाले, दारूबंदीबाबत आपण कदाचित काही आश्वासन दिलेले नसेलही, पण या निवडणुकीमध्ये महात्मा गांधीचा उल्लेख आहे की नाही? त्यावर जेठमलानी म्हणाले, हो आहे. बस्स! तेवढा उल्लेख ही दारूबंदीबाबतची आपली भूमिका राबवण्यास पुरेसा आहे. त्यावर जेठमलानी यानी पुष्कळ युक्तिवाद केला. ते म्हणाले, गांधींचे नाव आहे याचा अर्थ आपण त्याची प्रत्येक गोष्ट स्वीकारावी असा होत नाही. पण माझे म्हणणे ऐकून घेण्यासही त्यांनी नाराजी दाखवली. दारूबंदी हा त्यांच्या बाबतीत चर्चेचा विषय होऊ शकत नव्हता. दारूबंदीबाबत त्यांनी घेतलेली टोकाची भूमिका हास्यास्पद होती. पक्षामधील अनेकांना ती पटत नव्हती. श्री. जेठमलानी यांच्यासारख्या काही व्यक्तीनी तसे त्यांना बोलूनही दाखवले; परंतु दारूबंदीची प्रत्यक्षात जी फसगत झाली त्याबाबत काही ऐकून घेण्याचीही तयारी त्यांनी कधी दाखवली नाही.

दारूबंदीबाबत मोरारजीभाईंनी घेतलेली आग्रही भूमिका जनता सरकार कोसळण्यास एक प्रबळ कारण ठरली, असेही श्री. जेठमलानी याचे मत आहे. ते म्हणतात, दारूची निर्मिती, विक्री आणि दारूचे ग्राहक यांची एक मोठी चेन आहे. अनेक संपन्न मंडळी या निर्मिती आणि विक्रीच्या व्यवसायात गुतलेली आहेत. ती केवळ आर्थिकदृष्ट्या संपन्न आहेत असे नाही, तर या मंडळींपैकी अनेकांचा राजकीय वर्तुळातही जबर प्रभाव आहे. दारूबंदीबाबत थोडे नरम धोरण स्वीकारले असते तर काही आकाश कोसळणार नव्हते. ज्यामध्ये पंतप्रधानानी लक्ष घालावे असे असंख्य प्रश्न देशासमोर असताना पंतप्रधान अनेक वेळा दारूबंदीबाबतच का बोलतात हेही सर्वसामान्य लोकांना समजत नसे. स्वाभाविकपणे त्यांच्या या आग्रही भूमिकेचे हसे झाले. अनेक मंडळी दुखावली गेली आणि वेळ येताच मोरारजीभाईंचे सरकार पाडण्यासाठी या मंडळींनी हातभार लावला!

जेठमलानी याना मोरारजीभाईंचे जे अनुभव आले आहेत त्यातील थोडा-फार अतिशयोक्तीचा भाग सोडला तरी मोरारजो-

बाबतचा सर्वसाधारण अनुभवही काही फारसा चांगला नव्हता. ते पत्रकार–परिषद बोलवत आणि पत्रकाराने एखादा प्रश्न विचारला तर स्वत: पाच–सात प्रतिप्रश्न विचारत असत. त्यांच्या पत्रकार-परिषदाही पुढे पुढे फारच कंटाळवाण्या झाल्या. कारण प्रश्नोत्तरांच्या फैरी झडल्यावर पत्रकार परिषदेला जी एक झळाळी येते तीच नाहीशी झाल्याने आणि पत्रकार प्रश्न विचारण्यास बिचकू लागल्याने या पत्रकार–परिषदांना जवळजवळ प्रवचनाचे स्वरूप आले. अनेक पत्रकारांनी मोरारजीभाईंच्या या वर्तनाबाबत नाराजी नोंदवली; परंतु त्याचाही फारसा उपयोग झाला नाही. शेवटपर्यंत आपल्याच तोऱ्यात वावरणाऱ्या मोरारजीभाईंना अंतर्गत सत्तासंघर्षाला तोंड देता न आल्याने केवळ दोन वर्षांतच त्यांना सत्ता गमवावी लागली. त्यांनी शेवटपर्यंत चिकटून राहण्याचा प्रयत्न केला खरा; परंतु त्यांना फारसे यश येऊ शकले नाही.

## □ ज्ञानपीठ विजेते–शंकरन कुट्टी पोट्टेकार

साहित्यक्षेत्रामधील कामगिरीबद्दल दिल्या जाणाऱ्या ज्ञानपीठ पारितोषिकाला राष्ट्रीय स्तरावर मोठी प्रतिष्ठा असून पारितोषिकविजेत्या साहित्यिकाचा हा फार मोठा बहुमान समजला जातो. बक्षीसाची रक्कमही चांगली लाख रुपयाची असल्याने आर्थिकदृष्ट्याही हे पारितोषिक प्रथम क्रमाकाचे आहे. या वर्षी मल्याळी लेखक शंकरन कुट्टी पोट्टेकार यांना हा बहुमान मिळाला आहे. 'एका खेड्याची कथा' असे नाव असलेल्या त्यांच्या कादंबरीला हे पारितोषिक देण्यात आले आहे. एका खेड्याची कथा या कादंबरीमध्ये लेखकाने आपले आत्मचरित्रच सांगितले आहे. एस. के. यांचे बालपण ज्या अथिरानी पदम या खेड्यात गेले त्याच खेड्याची पार्श्वभूमी कादंबरीसाठी वापरली. असून कादंबरीचा नायक म्हणजे स्वत: एस. के.च आहेत.खाजगी जीवनातही ते एस. के. म्हणूनच ओळखले जातात. जाड काळा चष्मा, हातामध्ये एक छोटीशी लेदरबॅग, आणि सतत हसतमुख चेहरा असे त्यांच्या राहणीचे, बाह्यात्कारी व्यक्तित्वाचे वर्णन करता येईल.

एस. के. गेली अनेक वर्षे लेखन करत आहेत. सातत्याने लेखन करायचे तर जीवनात विविध स्वरूपाचे अनुभव घेतले पाहिजेत असे त्यांचे मत असल्याने त्यांचे स्वत:चे जीवनही विविध स्वरूपाच्या अनुभवांनी नटलेले आहे. एस. के. यांना घरगुती कारणामुळे आपले शिक्षण लवकर थांबवावे लागले. मॅट्रिक झाल्यानंतर काही काळ त्यांनी शिक्षकाची नोकरी केली. परंतु त्याचबरोबर लेखन चालू होते. एकमार्गी आयुष्य त्यांना नको असल्याने त्यांनी या नोकरीचा राजिनामा दिला व ते मुंबईला आले. तेथे टेक्सटाईल कमिशनरच्या कचेरीत त्यांना कारकूनाची नोकरी मिळाली. मुंबईमधील जीवन जवळून पहायची इच्छा असल्याने त्यांनी ती नोकरी स्वीकारली. मुंबईमधील डोळे फाडून टाकणारी संपन्नता आणि काळजाला घरे पाडणारे दारिद्र्य त्यांनी जवळून न्याहळले. त्यांच्या छोट्या खेडेगावापेक्षा येथील जीवन अगदी वेगळे होते आणि लेखकाच्या जागरूक नजरेतून ते या जीवनामधील अनुभवांची नोंद करत होते. आपल्या अनेक लेखातून, तसेच कादंबऱ्यामधून त्यांनी मुंबईमधील जिवनानुभवाचा वापर केला. त्यांच्या अनेक लघुकथांचे मल्याळीमध्ये उत्तम स्वागत झाले. या लघुकथामुळेच त्यांना लेखक म्हणून झपाट्याने प्रसिद्धी मिळाली. विषकन्या, रस्त्याची कहाणी, अशा अर्थाचे नाव असलेल्या कादंबऱ्या त्यांनी प्रारंभीच्या काळात लिहिल्या. रस्त्याची कहाणी या कथेमध्ये कालिकतमधील चोरट्या विश्वाचे दर्शन घडते. तर विषकन्यामध्ये त्यांनी ख्रिश्चन तरुणाची कथा सांगून त्या समाजाच्या दैनंदिन जीवनाचे चित्रण केले आहे. अत्यंत वास्तव वाटाव्यात अशा व्यक्तिरेखा समर्थपणे सादर करण्यात एस. के. यांचा हातखंडा आहे. एस. के. यांच्या लिखाणाची अन्य वैशिष्ट्ये म्हणजे प्रवाही शैलीमध्ये ते घटनास्थळाचा तपशिल वाचकांसमोर ठेवतात. या तपशिलावरून तसेच त्यांच्या लेखनशैलीवरून त्यांच्या सूक्ष्म निरिक्षणशक्तीचा प्रत्यय येतो. मल्याळममध्ये नवीन लेखकांची लाट आली. लिखाण करण्याच्या पद्धतीत पुष्कळ बदल झाले. पण एस. के. या नवीन प्रवाहात सामावले गेले नाहीत. त्यांनी स्वत.च्या लेखन शैलीवर लुब्ध असलेला वाचकवर्ग निर्माण केला आणि टिकवला. त्यांना खरी प्रसिद्धी मिळाली ती लघुकथा लेखक व प्रवासवर्णनकार म्हणून. आजपर्यंत त्यांच्या ८ कादंबऱ्या व २३ लघुकथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. प्रारंभीच्या काळात ते थोड्या-फार कविता लिहीत असत, परंतु पुढे त्यांनी कथालेखनावर लक्ष केंद्रीत केले.

आज त्यांचे वय ६८ वर्षांचे आहे. त्यांची इच्छा होती त्याप्रमाणे बहुढंगी जीवन त्यांच्या वाट्याला आले आहे. नोकरीपेशामध्ये जिव रमेनासा झाल्यावर त्यांनी हातची नोकरी सोडून दिली व राजकारणात प्रवेश केला. १९३९ च्या त्रिपुरा काँग्रेसपासून ते काँग्रेसशी संबंधित आहेत. १९६२ ते ६७ अशी पाच वर्षे ते लोकसभेचे सदस्य होते. स्वाभाविकपणे या काळात त्यांना राजकारणामधील विविध खेळीचे जवळून दर्शन घडले. या अनुभवावर आधारलेली नवीन कादंबरी ते सध्या लिहीत असून त्यांच्या या कादंबरीचे नावच 'द नॉर्थ अॅव्हेन्यू' असे आहे. १९६९ मध्ये त्यांच्या तेरा लघुकथांचे रशियन भाषेत भाषांतर झाले. इंग्रजी व जर्मन भाषांतही त्यांच्या कथा अनुवादित झालेल्या आहेत.

ज्ञानपीठ-पारितोषिक मिळवणारे एस. के. हे दुसरे मल्याळी साहित्यिक आहेत. यापूर्वी के. शंकर कुरूप यांनी हा सन्मान मिळवलेला आहे. □


व्हान गॉग

'लस्ट फॉर लाइफ' या आयर्व्हिंग स्टोनच्या
जगप्रसिद्ध कलाकृतीचा मराठी अनुवाद
अनुवादिका : माधुरी पुरंदरे

प्रकाशक
प्रसाद पुरंदरे, पर्वती, पुणे

# विषमतानिर्मूलनावर येथे एक ‘ वर्कशॉप ’ सुरू झालं होतं....



लेखक : विजय परुळकर । लेखांक : आठवा

‘रस्ता रोको ’ आंदोलन सुरू होऊन चौदा दिवस लोटले होते तरी शासनाकडून कसल्याच हालचालीची चिन्हं दिसत नव्हती. सुरुवातीच्या दोन–तीन दिवसांत शासनाचा थंडपणा पाहून काहीसा बावचळून गेलेला शेतकरी आता बराच सावरला होता. कितीही दिवस लागले तरी बेहत्तर, पण तंबाखूला भाव मिळेपर्यंत आता रस्त्यावरून उठायचं नाही असा दृढ निश्चय शेतकऱ्यांनी केला होता. सुरुवातीच्या दिवसांत प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसणारा मानसिक ताण आठवड्याभरातच ओसरला होता. १८ मार्चला सर्व शेतकरी सत्याग्रहींनी एक दिवसाचं सांघिक उपोषण केलं होतं. तीन हजार माणसं ढळढळत्या उन्हात, तापलेल्या डांबरी सडकेवर पाण्याचा घोटदेखील न घेता शांतपणे शिस्तीनं बसून राहिली होती. कुणीही तंबाखू मळत नव्हतं किंवा विडीचा धूरदेखील काढत नव्हतं. काही गावच्या शेतकरी सत्याग्रहींनी तर उपोषणाबरोबरच मौनदेखील पाळलं होतं.

निपाणीचा टोलनाका ते यमगर्णीपर्यंतच्या तीन किलोमीटर लांबीच्या राष्ट्रीय महामार्गावर एक्याऐंशी गावच्या तीस हजार शेतकऱ्यांनी सांघिक उपोषणाला बसण्याचं ते अभूतपूर्व दृश्य भारावून टाकणारं होतं. अर्धपोटी बळीराजा पोटभर भाकरीच्या न्याय्य मागणीसाठी सूर्याच्या साक्षीनं उपोषणाला बसला होता. ह्या सांघिक उपोषणाचा शेतकऱ्याच्या मनोवृत्तीवर जबरदस्त परिणाम झाला असणार–त्याच्या मनीची मरगळ नाहीशी होऊन त्या जागी जबर आत्मविश्वास निर्माण झाला असणार. सत्याग्रहींनी इतक्या मोठ्या संख्येनं केलेलं सांघिक उपोषण पहाण्याचा माझा हा पहिलाच प्रसंग. सांघिक उपोषणात दडलेलं विलक्षण सामर्थ्य आणि त्याचा प्रभाव पहाण्याचा योग होता हे माझं मोठं भाग्य !

‘ रस्ता रोको ’ आंदोलनाच्या निमित्तानं वसलेली ही आंदोलननगरी अनेक दृष्टींनी वैशिष्टचपूर्ण होती. सुरुवातीला एखाद्या वादळाच्या किंवा महापुराच्या तडाख्यात बेघर आणि निर्वासित झालेल्या लोकांनी उभ्या केलेल्या तात्पुरत्या वसाहतीप्रमाणे दिसणारी आंदोलननगरी आठवड्याभरातच एखाद्या चैतन्यमय टुमदार वस्तीप्रमाणे दिसू लागली होती. आंदोलननगरीत नळ आला होता, वीजदेखील आली होती. प्रत्येक गावच्या छावणीत विजेचं स्वतंत्र ‘कनेक्शन’ आणि रस्त्यावरील झाडांवर दुतर्फा ट्यूबलाईटस् !

आंदोलननगरीतील स्वच्छता वाखणण्यासारखी होती. तीन किलोमीटर पसरलेल्या ह्या छावणीत कुठंही कचरा किंवा घाण नजरेस पडत नव्हती. वाऱ्याची दिशा लक्षात घेऊन अंतरा-अंतरावर आडोसे उभे करून शेतकऱ्यांनी शौचकुप आणि स्नानगृह उभारली होती. कुठंही उष्टचा पत्रावळींचा ढीग, कागदाचे बोळे किंवा मानवनिर्मित घाण दिसत नव्हती. निपाणीच्या सडकेवर तीन हजार किसान रात्रंदिवस तळ ठोकून होता आणि कुठंही माशा घोंघावत नव्हत्या. तीस हजार शहरकरी एखाद्या ठिकाणी इतक्या दिवसाच्या ‘पिकनिक’ साठी गेले तर त्या परिसराची काय अवस्था होईल ?

ह्या आंदोलननगरीमध्ये वस्तीला असलेल्या हजारो शेतकऱ्यांच्या सोयीसाठी निपाणीमधील छोटचा दुकानदारांनी आणि खाद्यपदार्थविक्रेत्यांनी असंख्य हातगाडचा आणि ‘स्टॉल्स्’ उभे केले होते. आंदोलननगरी निपाणीपासून एक किलोमीटर अंतरावर. निपाणीत चहा पंचवीस पैसे तर आंदोलननगरीत ‘ खास शेतकऱ्यांसाठी ’ वीस पैसे! कलिंगडाची फोड निपाणीत तीस पैसे, आंदोलननगरीत दहा पैसे ! सर्व विक्रेत्यांनी सर्व पदार्थांचे भाव स्वखुशीनं शेतकऱ्यांच्यासाठी सवलतीचे ठेवलेले. आणि माल चोख–कसलीही भेसळ नाही. आंदोलननगरीतील हातगाड्यांवरील किंवा ‘स्टॉल्स्’ मधील खाद्यपदार्थांचं सेवन करून कुणालाही जुलाब झाले नाहीत, वांत्या नाहीत–साधं अपचन देखील नाही !

वास्तविक आंदोलन करणारे शेतकरी आणि खाद्यपदार्थांची विक्री करणारे ह्यांचं काही वर्षांपासून विळचा-भोपळचाइतकं सख्य. दिल्लीमध्ये भरणाऱ्या किसान मेळाव्याला पाठविण्यात आलेल्या सरकारी किसानांनी खाद्यपदार्थांच्या स्टॉल्स्ची इतक्या वेळा लूट केली आहे की ह्या स्टॉलवाल्यांनी किसान मेळावा ह्या शब्दाचा धसकाच घेतला आहे. किसान मेळावा मग तो चरणसिंगांचा असो, बाईंचा किंवा शरदरावांचा (जोशी नव्हे–पवार)–खाद्यपदार्थांचे त्या परिसरातील सर्व स्टॉल्स् बंद !

–पण आंदोलननगरीतील दृश्य एकदम वेगळं. इथं जवळजवळ दीडशे स्टॉल्स् होते आणि मी व माझ्या बायकोनं बहुतेक प्रत्येक

स्टॉलवर, प्रत्येक हातगाडीवाल्याजवळ चौकशी केली तेव्हा सर्वांचं उत्तर एकच– नाही आमची एक दमडीसुद्धा कुठल्या शेतकऱ्यानं बुडविली नाही किंवा कधी उधार माल मागितला नाही त्याउलट अनेकांनी सांगितलं 'अहो, यल्लमाच्या जत्रेला आम्ही जेव्हा दुकान उघडतो तेव्हा देवीच्या दर्शनाला आलेली माणसं आमचे पैसे बुडवतात, माल पळवतात ; पण इथं तंबाखूदेवीच्या यात्रेला जमलेल्या शेतकऱ्यानं आमची एक पैदेखील बुडवली नाही.'

अठरा मार्चला जेव्हा शेतकरी सांघिक उपोषणाला बसणार होते तेव्हा सतरा तारखेला रात्री कार्यकर्ते खाद्यपदार्थ-विक्रेत्यांना विनंती करत होते की, तुमच्या हातगाड्या निपाणीला न्या, स्टॉल्स्‌मधील माल घेऊन जा ! विक्रेते म्हणाले होते, आम्ही धंदा बंद ठेवतो; पण गाड्या आणि माल इथंच राहू दे–रस्त्यामधील अडथळयांमुळे नेआण करणं कठीण. माल राहू दे. आम्ही उद्याचा दिवस आंदोलननगरीकडे फिरकतदेखील नाही, म्हणजे धंदा करायचा आम्हाला मोह होण्याचा देखील प्रश्न नाही. कार्यकर्ते म्हणाले, आम्ही मालाची जबाबदारी घेणार नाही, सामानाची जबाबदारी घेणार नाही! विक्रेते म्हणाले, नका घेऊ, आम्हाला काळजी नाही !

विक्रेत्यांनी आंदोलक-शेतकऱ्यांबद्दल दाखविलेला विश्वास श्रेष्ठ का शेतकऱ्याचं इमान श्रेष्ठ ! कुणास ठाऊक! विक्रेत्यांच्या सामानाला तर सोडाच, पण साखरेच्या कणालादेखील कुणी स्पर्श केला नाही! मुंग्यांनी काय दाणे पळवले असतील तेव्हढीच चोरी ! एखाद्या शहरामध्ये खाद्यपदार्थ-विक्रेते आपल्या हातगाड्या किंवा दुकाने चोवीस तासांसाठी अशा प्रकारे सोडून गेले तर ? दिल्लीतील किसान मेळाव्याच्या आसपास त्यांनी खाद्यपदार्थ विक्रीसाठी ठेवले तर ?

अशा वेळी शरद जोशी जे नेहमी सांगतात त्याची मनोमन प्रचीती येते– शेतकरी हा ह्या देशाच्या राजा आहे ! खरंच शेतकरी राजा आहे. मनानं, विचारानं, वागणुकीनं, सभ्यतेनं तो राजयोगी आहे. 'आम्ही' आज त्याला आर्थिकदृष्ट्या नादान करून ठेवलं असलं तरी तो अजूनही चोर झालेला नाही, नादान झालेला नाही– आणि होणार नाही ! 'आपण' मात्र हरामजादे आहोत हेच खरं !

१४ मार्च रोजी 'रस्ता रोको' आंदोलन सुरू करताच अटकसत्र सुरू होणार ह्या तयारीनं आलेल्या शेतकऱ्याला जेव्हा अनिश्चित कालपर्यंत रस्त्यावर रात्रंदिवस ठाण मांडून बसायची वेळ आली तेव्हा अर्थातच भाकरीचा प्रश्न निर्माण झाला. निपाणीमधील सामान्य नागरिकांनी, मध्यमवर्गीयांनी नेहमीप्रमाणे उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. घरोघरी भाकरी गोळा केली जाऊ लागली आणि आंदोलननगरीत झुणका भाकरीचे डोंगर उभे राहिले ! 'अंबिली' च्या नद्या वाहू लागल्या ! (अंबील म्हणजे जोंधळयाच्या किंवा नाचणीच्या पिठात ठेचलेली लसूण घालून बनवलेलं एक अतिशय रुचकर आणि पौष्टिक पेय ) नजदीकच्या आणि त्यातल्या त्यात सुस्थितीत असलेल्या छोट्या-मोठ्या गावांतून जोंधळयांच्या पोत्यांचा सतत पुरवठा सुरू झाला. तंबाखू शेतकऱ्यांना नासिकच्या ऊसकरी शेतकऱ्याकडे ज्वारी-बाजरी मागायची वेळ आली नाही. तंबाखू आणि विडी कामगार-स्त्रियांनी अहोरात्र भाकरी थापून शेतकऱ्याच्या थाळीत सतत गरमगरम भाकरी पडेल याची खबरदारी घेतली !

ह्या आंदोलननगरीत जे घडत होतं त्याचं आतापर्यंत जे वर्णन केलं ते असामान्य असं वाटेल; पण खरं असामान्य आणि अघटित असं जे घडत होतं ते ह्या सर्वांपासून वेगळं होतं. स्वार्थी राजकारण्यांनी शेतकऱ्यांच्यात अनेक मार्गांनी सतत फूट पाडण्याचाच आजपर्यंत प्रयत्न केलेला. शेतकरी जितका असंघटित तितका त्यांच्यापासून जास्त फायदा उपटणं शक्य-तितका स्वतःचा राजकीय मतलब साध्य करणं शक्य !

'रस्ता रोको'च्या निमित्तानं शेतमालाला भाव मिळालाच पाहिजे म्हणून रस्त्यावर ठाण मांडून बसलेल्या शेतकऱ्यांच्यातील राजकारण्यांनी निर्माण केलेली आणि कधीही न बुजणारी अशी ही 'फूट' सांधली गेली. इथं कानडी होते, मराठी होते; लिंगायत, ब्राह्मण, मराठा, मुसलमान, समस्त हरिजन इथं होते, शेतकरी होते, शेतमजूर होते; डावे होते, उजवे होते, मधले आणि वर-खालचेदेखील होते ! आणि हे सर्व एकत्र एकमेकाची भाकरी तर खात होतेच, एकमेकांच्या सुख-दुःखांची देवाण-घेवाण तर करत होतेच; पण सर्वांत महत्त्वाचं म्हणजे शेतमालाला त्याचा उत्पादनखर्च भरून निघेल असा भाव मिळालाच पाहिजे ह्याबद्दल सर्वांचं एकमत होतं आणि त्यासाठी सर्वजण खांद्याला खांदा लावून एकमेकासाठी स्वत.च्या प्राणाची आहुतीदेखील द्यायला तयार होते ! एखाद्या वातानुकूलित सभागृहात बसून, व्यासपीठावरून वर्ग-वर्णभेद ह्यांचं चर्वितचर्वण करत एकमेकांची पाठ खाजविणाऱ्यांनी केलेली वांझोटी बडबड आणि आंदोलननगरीत प्रत्यक्ष अंकुरणारा 'बदल' ह्यात फार मोठा फरक होता ! आंदोलननगरीत विषमता निर्मूलनावर 'चर्चा' चालू नव्हती तर 'वर्कशॉप' सुरू झालं होतं. विषमता-निर्मूलनाचं पहिलं पाऊल इथं उचललं जात होतं. तथाकथित बुद्धिवंतांनी हे पहिलंच पाऊल बुद्धिभेदाच्या कुऱ्हाडीचा घाव घालून यंदाच्या अपंग वर्षाला सहाय्य केलं नाही म्हणजे मिळवली !

तर अशी ही आंदोलननगरी. इथं फक्त तंबाखूचा लढा चालू नव्हता– खरं तर तंबाखूच्या भावाचा प्रश्न आता गौणच झाला होता आणि शेतकऱ्याच्या स्वातंत्र्ययुद्धाची ज्योत हळूहळू आकार घेत होती.

आंदोलननगरीत जे घडत होतं त्याला सामाजिक आणि राजकीय प्रश्नांच्या संदर्भात एक वेगळंच महत्त्व प्राप्त झालं होतं. आंदोलननगरीत एकत्र आलेले शेतकरी आता बोलू लागले होते. मनातील सर्व काही ते आता मनमोकळेपणे उघड करू लागले होते. एखादा किसान, मग तो संयुक्त महाराष्ट्र समितीचा कार्यकर्ता असला तरी, आता विचार करू लागला होता. उघडपणे आणि स्पष्टपणे आपले विचार मांडताना म्हणू लागला होता, 'इथून पुढं कुणी जर संयुक्त महाराष्ट्र समितीची नाव सांगून मतं मागायला आला तर त्याला जोडेच मिळतील !' रस्त्यावर जे तीस-पस्तीस हजार शेतकरी ठाण मांडून बसले होते त्याच्या कुणाच्याही डोक्यात आता सीमावादाचं खूळ पिंगा घालत नव्हतं. सीमावादाने कुणाचीही 'अस्मिता' इथं दुखावली जात नव्हती. मुळात 'आपली अस्मिता ती ही नव्हे' असंच सगळयांना जाणवू लागलं होतं. इतके दिवस स्वार्थी राजकारण्याची मतलबी 'अस्मिता' जोपासण्यातच आपण तन, मन, धन खर्चलं हा साक्षात्कार अनेकांना झाला होता.

इथं आता फक्त एकच वाद होता. तंबाखूचा उत्पादनखर्च भरून निघेल असा भाव मिळाच पाहिजे ! हा 'मिळालाच पाहिजे' 'झालाच पाहिजे' पेक्षा खूप वेगळा होता. आंदोलननगरीत छावणी उभार-लेल्या गावांच्या नावाचे फलक कानडी भाषेत होते आणि मराठीतही होते. घोषणांचे फलक कानडी आणि मराठी अशा दोन्ही भाषांमधून लिहिलेले एकत्र दिमाखानं फडकत होते. पूर्वी ह्या भागात हे घडणं अशक्य. जाळपोळच झाली असती. कारण राजकीय पुढाऱ्यांनी तशीच शिकवण दिलेली.

आंदोलननगरीत तंबाखू शेतकरी सूर्यास्त होताच गौळणी, भजनं. भारुडं म्हणत, एकमेकांचं मनोरंजन आणि प्रबोधन करत. एक भजन कानडी, तर दुसरं भजन मराठी. इथं कुठं सीमावाद किंवा भाषेचा वाद होता ?

भाषावार प्रांतरचना झाली तेव्हा काही हुषार व्यापारी-दला-लानी रचनाकाराना खिशात घालून निपाणीची योजना महाराष्ट्र-कर्नाटकच्या सीमेवर करवून घेतली. ह्यात अनेक फायदे होते. ते फायदे शेट लोक आणि इतर दलाल उपटत राहिले.

भाषावार-प्रांतरचना झाल्यापासून निपाणी परिसराला अनेक पुढाऱ्यांनी आणि 'सामाजिक कार्यकर्त्यांनी' भेटी दिल्या. सीमावाद, देवदासींचा प्रश्न, तंबाखू-विडी कामगारांचा प्रश्न, ह्या सर्व वेगवेगळया प्रश्नाखातर ह्या भागाला भेटी देऊन ह्या पुढाऱ्यांनी वेगवेगळी भाषणे केली.

ह्या परिसरात जेव्हा अभूतपूर्व असं आंदोलन उभं राहिलं तेव्हा तंबाखू उत्पादक शेतकऱ्यांच्या मागणीला पाठिंबा म्हणून फक्त शेतमजूरच नव्हे तर तंबाखू आणि विडी कामगार-स्त्रिया, ज्यांच्या-मध्ये अनेकजणी देवदासी आहेत, त्यादेखील उतरल्या. सगळे वर्ग-वर्णभेद जाळून पुन्हा असे आंदोलन उभे रहाणे नाही आणि हे घडले तेदेखील केवळ सुभाष जोशीमुळेच !

—असं असताना, ह्यापूर्वी, ह्या परिसरात 'फुटकळ' सदस्यांचं भांडवल करून सभा गाजवणारे नेते आणि त्यांच्या सावलीनं फिरणारे 'विचारवंत लेखक' वगैरे पुरोगामी विचारसरणीचे सामाजिक धुरंधर ह्या संपूर्ण आंदोलनाच्या वेळीच कुठं गायब झाले ? त्यांनी इथं येणं आवश्यक होतं. जॉर्ज फर्नांडिस, मृणाल गोरे, अहिल्या रागणेकर इत्यादी इत्यादींची सर्वच शेतकरी वाट बघत होते. पन्नालाल सुराणांची शेतकरी वाट बघत होते.

राजकारणी पुढाऱ्यांना एक वेळ कारण सांगणं शक्य आहे—ते म्हणतील, शरद जोशींना राजकीय पक्षवाले आलेलं आवडत नाही ! राजकीय पुढाऱ्यांनी हा सोयिस्कर गैरसमज करून घेतला आहे हा भाग अलाहिदा, त्यांच्याशी वाद नाही. कारण वाद घालण्यात अर्थ नाही. ह्या बोटावरची थुंकी त्या बोटावर करण्यात पटाईत असलेले हे लोक !

राजकारण गेलं उडत—पण सामाजिक कार्यकर्त्यांचं काय ? शेत-करी त्यांची वाट बघत होते ! ह्या परिसराला भेट दिलेल्या पुरो-गामी बुद्धिवंतांचं काय ? शेतकरी त्यांचीही वाट बघत होते ! ह्या मंडळींना तर शरद किंवा सुभाष जोशींनी कधी अडसर दाखवला नाही ?

¤

आंदोलननगरीतील एका छोटया गावच्या छावणीतील काही वृद्ध शेतकऱ्यांबरोबर मी गप्पा मारत बसलो होतो. सत्तरीच्या जव-ळचा एक वयोवृद्ध शेतकरी सांगू लागला—

'अहो, ह्या देवचंदशेठइतकाच ह्या भागात माजी आमदार रघुनाथ कदम ह्यांचा दबदबा ! दीड महिन्यापूर्वी शरद जोशींच्या सभा सुरू झाल्या तेव्हा आपल्या गावात ह्या विचाराचा प्रसार होऊ द्यायचा नाही ह्यासाठी त्यांनी खूप खटपट केली. एका खेडे-गावात आमच्या गावचे कार्यकर्ते तंबाखू-आंदोलनाची जाहिरात चिकटवायला गेले तर त्यांना जाहिरात लावायला बंदी करण्यात आली. त्यांचं म्हणणं होतं, 'ही चळवळ सरकारच्या आणि इंदिरा कॉंग्रेसच्या विरुद्ध आहे, म्हणून आम्ही जाहिरात चिकटवू देणार नाही.

'पण आमच्या कार्यकर्त्यांनी जाहिरात चिकटवली. पुढाऱ्याच्या माणसानं ती फाडून काढली. शेतकरी मग खवळले आणि तिथं दणादणी झाली. जाहिरात फाडणाऱ्याला शेतकऱ्यांनी दणकला. त्याला आता गावातून यायला-जायलाच बंदी केली आहे. त्यानं आता हात जोडून गावाची माफी मागीतली आहे, इतकी आता माणसं जागृत झालीत !'

दुसरा एक शेतकरी सांगू लागला, 'आमच्या भागात पोलिसांचा दरारा फार मोठा. पोलिस बघितला की माणस घाबरायची. समि-तीच्या आंदोलनाच्या वेळी—सीमावादाच्या वेळी कर्नाटक सरकारनं पोलिसांना पूर्ण अधिकार देऊन धुडगूस घालायला मोकळीक दिली. तेव्हापासून आंदोलन म्हटलं की लोकाची हाडं मोडून काढायची इकडच्या भागातील पोलिसांना सवय लागली आहे. ह्या तंबाखू-आंदोलनामुळं मात्र पोलिसांचा दरारा पूर्णपणे नाहीसा झाला आहे.

'आम्ही राष्ट्रीय महामार्ग अडवून बसलोय; पण पोलिसांची आम्हाला हात लावायची हिंम्मत नाही ! हा अनुभव आम्हाला एकदम नवीन आहे. पोलीस असे गोगलगायीसारखं नरम पाहून नाक खाजवून त्याची खोड काढावी असं काही तरुण पोरांना वाटत, पण आमचे 'सर'— सुभाष जोशी त्यांना दटावतात. 'सरां'च्या धाकामुळं ही पोरं गप्प आहेत !

'पोलिस म्हणजे दंडुका ! पण दंडुकेशाहीची आमची भीती आता पार पळून गेली. आंदोलनामुळं झालेला हा फायदा फार मोठा आहे. निपाणीत सदा धुमाकूळ घालून मस्तीत फिरणारा एक फौजदार इथं आंदोलननगरीत पाय ठेवायला घाबरतो. इतके दिवस आम्ही त्या फौजदाराला घाबरत होतो आता तो आम्हाला घाबरायला लागला !

'अहो, पूर्वी निपाणीच्या हॉटेलात एखादा शेतकरी जाऊन बसला तर तिकडचा पोऱ्यादेखील त्याच्याकडं लक्ष द्यायचा नाही. आता मालक स्वतः 'ऑर्डर' घ्यायला धावत येतो. शेतकऱ्यांच्या तंबाखूला

**सगळे वर्ग, वर्णभेद जाळून पुन्हा असे आंदोलन उभे राहणे नाही !**

अजून भाव मिळायचा आहे; पण आंदोलन सुरू झाल्यापासून शेत-कऱ्याला मात्र एकदम भाव मिळायला लागलाय हे मात्र खरं!'

एक तरुण शेतकरी उत्साहानं सांगू लागला, '–काल मी केस कापून घ्यायला सलूनमध्ये गेलो. तिथं एक शेतकरी बसला होता. त्याच्या शर्टावर शेतकरी संघटनेचा बिल्ला होता. सलूनच्या मालकानं त्याला स्वत. होऊन खुर्चीवर बसवलं आणि आपल्या कारगिरांना बजावलं, 'शेतकरी संघटनेच्या माणसांचं काम पहिल्यांदा'– अहो, ह्याच सलूनमध्ये तंबाखू व्यापाऱ्यांची आणि त्यांच्या चमच्यांची तरुण पोरं पैसे फेकून पहिल्यांदा नंबर लावायची; पण नुसतं शेत-करी संघटनेचा बिल्ला बघून सलूनच्या मालकानं स्वतः पुढं होऊन शेतकऱ्याला खुर्चीत बसवलं–हे असं त्या शेतकऱ्याच्या आयुष्यात पूर्वी कधीही घडलं नसेल!'

'आज हॉटेलपासून न्हाव्याच्या सलूनपर्यंत सर्वत्र शेतकऱ्याला मान मिळू लागलाय. का?–तो संघटित झालाय म्हणून. तो असंघटित असता तर लूत लागलेलं कुत्रं देखील त्याच्याकडे ढुंकून पहाणार नाही!'

ह्या तरुण शेतकरी जे सांगत होता ते ऐकून माझी आई नेहमी जे म्हणते त्याची मला आठवण झाली. तिची इच्छा अशी आहे की, शेतकरी रस्त्यावरून चालला असताना पोलिसांनी त्याला खाडकन सॅल्यूट मारून बाकीचा ट्रॅफिक तो रस्ता पार करेपर्यंत रोखून धरावा हे दृश्य मरण्याअगोदर एकदा तरी पहायला मिळावं असं ती नेहमी म्हणत असते!

शेतकऱ्यांच्याबरोबर गप्पा मारून, चुना-तंबाखू मळून मी माझ्या बायकोच्या शोधात आंदोलननगरीतून फिरू लागलो. ती एका चिंचेच्या झाडाच्या सावलीत बायकांच्या घोळक्यात बसून विचारत होती,

'बायांनो, तुम्ही कुठल्या?'

'आम्ही बेनाडीच्या–निपाणीपासून नऊ मैलांवर आमचं गाव?'

'मग इथं इतके दिवस रस्त्यावर बसून काय करताय?'

'आमच्या माणसानी तंबाखूला भाव पाहिजे म्हणून आंदोलनात भाग घेतलाय, त्यांच्या संगं आम्हीपण आदोलनाला बसलोय.'

'तुमची सगळ्यांची शेती आहे?–काय काय पिकं घेता?'

'सगळ्यांची जमीन आहे. आम्ही शेतकरी बाया. तंबाखूशिवाय दुसरं काहीही पिकत नाही आमच्या जमिनीत. तंबाखू पिकवायचा, विकायचा आणि पोटाला खायचं.'

'आंदोलनात भाग घेऊन रस्त्यावर येऊन बसा असं तुम्हाला कुणी सांगितलं?'

'कुणी नाही–आमच्या गावात शरद जोशींचं भाषण झालं आणि शेतकऱ्यांनीच ठरवलं की, इथं जमायचं आणि रस्ता अडवायचा. हे व्यापारी आमचा तंबाखू स्वस्त दरानं घेतात. बाकी सर्व महाग झालंय, मग आम्ही जगायचं कसं? तंबाखूला रास्त भाव द्या ही मागणी मांडायला आम्ही रस्त्यावर बसलोय. आमचा तंबाखू एक रुपया–दीड रुपयानं मागतात, काही व्यापारी सत्तर पैशानं मागतात–आम्हाला ते परवडत नाही!'

'मग इतक्या कमी भावात तुम्ही विकता कशाला?'

'मग घरात ठेवून काय करायचं? पोटाला काय खायचं?'

'–दुसऱ्या व्यापाऱ्याला विकावा!'

'घेत नाहीत. व्यापाऱ्यांची एकी फार! आम्ही एका व्यापाऱ्याला माल विकायचा नाही असं ठरवलं तर दुसरा कुठलाच व्यापारी आमच्या तंबाखूला हात लावत नाही. व्यापारी सांगेल त्या भावाला विकावाच लागतो तंबाखू. आमचा काहीच इलाज चालत नाही. शरद जोशी, सुभाष जोशी आमच्या गावात जेव्हा आले, सगळे शेतकरी एक होऊन आंदोलन करा. तंबाखूला भाव मिळेल म्हणाले म्हणून आम्ही इथं रस्ता अडवायला येऊन बसलोय!'

'असं किती दिवस बसणार?'

'महिनाभर–दोन महिने, तंबाखूला भाव मिळेपर्यंत आम्ही बसणार! अहो, तंबाखूचं पीक काढणं सोपं नाही. तान्ह्या मुलापेक्षा जास्त तंबाखूच्या रोपाची काळजी घ्यावी लागते तेव्हा कुठं चांगलं पीक येतं; पण शेवटी सगळं मातीमोल दरानं विकावं लागतं! एव्हढे कष्ट घेऊन तंबाखू पिकवायचा; पण घरात भाकरीबरोबर तोंडी लावायला चटणीची अडचण! अंगावर धड लुगडं नाही, पोरांना कपडा नाही, हे असं किती दिवस चालवून घ्यायचं? आता तंबाखूच्या दराचा निकाल लागेपर्यंत आम्ही इथंच ठाण मांडून बसणार. सरकारला काय करायचं असेल ते करू दे!'

¤

अकोळच्या तरुण मंडळाचा कार्यकर्ता आय. एन. बेग हा सदा गडबडीत, धावपळीत असायचा. त्याच्याशी निवांतपणे सलग तासभर बोलण्याची संधी मिळणं महाकठीण! एके दिवशी दुपारी शेतकरी संघटनेच्या तंबूशेजारील बाभळीच्या काटेरी सावलीत बेग इतर तीनचार तरुण कार्यकर्त्यांबरोबर भाकरी खात बसलेला दिसला. मला पहाताच म्हणाला–'या भाकरी खायला!' मी लगेच त्याच्या शेजारी बैठक मारली. चारदोन इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर मी कबुली दिली–'नासिक आंदोलनात कुठल्याही एका जागी एव्हढ्या मोठ्या संख्येनं आंदोलक शेतकरी जमलेले मी पाहिले नाहीत! इथं आज जे दृश्य दिसतय ते खरोखरीच अद्भुत म्हणावं असं आहे. आज पंधरा दिवस झाले;–पण तीस–पस्तीस हजार शेतकऱ्यांपैकी कुणाचंही मनोधैर्य खचलेलं दिसत नाही. कुठंही शिस्तभंग नाही. ह्या अभूतपूर्व सत्याग्रहातून काय निर्माण होईल असं तुम्हाला वाटतय?'

बेग म्हणाला, 'गेली आठ-दहा वर्षं जे स्वप्न आम्ही उराशी बाळगून आहोत ते आता प्रत्यक्षात उतरण्याची वेळ आली आहे. तंबाखू शेतकऱ्याचा भाग्योदय जवळ आला आहे. गेल्या दीड महिन्यापासून-शरद जोशींनी ह्या भागाचा दौरा केल्यापासून–इथं जागृतीचं एक नवीन वारं वाहू लागलं आहे. आज तुम्ही जे पस्तीस हजार शेतकरी आपल्या बायका मुलांसह या बैलगाड्या घेऊन इथं रस्ता-वर तळ ठोकून बसलेले पहाता त्याला कारण शेतकऱ्याच्यात घडून आलेली जागृती!

'तंबाखूला भाव मिळणार की नाही हा मुद्दा आता गौण आहे. इकडच्या भागात ज्या पद्धतीचं राजकारण फोफावलं होतं, त्या राजकारणात मुरलेल्या प्रस्थापित राजकीय पुढाऱ्यांना इथून पुढं स्थान उरलं नाही ही सर्वांत महत्त्वाची गोष्ट आहे! हा फायदा फार मोठा आहे. आजपर्यंत ह्या भागातील सामाजिक, राजकीय,

आर्थिक ह्या सर्व चळवळीवर तंबाखू व्यापाऱ्यांची आणि त्यांच्या खिशातील राजकारण्यांची जबरदस्त पकड होती. ह्या आंदोलनामुळे शेतकरी संघटित झाले. कन्नड भाषी-मराठी भाषी एकत्र आले ही घटना अद्‌भुत म्हणावी अशीच आहे ! हे शेतकरी तरुण कार्यकर्त्यांच्या नेतृत्वाखाली एकत्र आलेत हा मुद्दादेखील महत्त्वाचा आहे. तथाकथित मोठे पुढारी सगळे घरात तोंड लपवून बसले आहेत. आणि ताज्या दमाचे कार्यकर्ते पुढाकार घेऊ लागले आहेत. तंबाखूला भाव मिळण्यापेक्षाही हा फायदा फार मोठा आहे! तंबाखू-आंदोलनातील हे एक लक्षणीय आणि अनपेक्षित असं यश आहे.

बेगनं एक नवा मुद्दा मांडला होता. त्याच्याशी सहमत होत मी म्हणालो-'स्वार्थी राजकारणानं बरबटलेल्या पुढाऱ्यांना बाजूला सारून ताज्या आणि स्वच्छ रक्ताची तरुण पिढी शेतकऱ्याला मार्गदर्शन करण्यासाठी पुढं येत आहे ही खरोखरीच भाग्याची गोष्ट. तुम्ही अकोळच्या तरुणानी ह्या प्रश्नाबाबत १९७२-७३ सालापासूनच पुढाकार घेतला-त्यामागच्या प्रेरणा काय ?'

बेग म्हणाला, 'आम्ही अकोळला चळवळ सुरू करण्याआधी, म्हणजे १९७० सालच्या सुमारास मुस्लिम सत्यशोधक मंडळ, राष्ट्रसेवा दल, सुभाष जोशी ह्याच्याशी माझा वारंवार संबंध येत होता. तिथं अधूनमधून ह्या प्रश्नावर विचार मांडण्यात येत असत. आमच्याबरोबर चर्चा करायला गनी पटेल, महंमद नाईक, सातप्पा शेटके, जकाप्पा ही मंडळी नेहमी असत. १९७२ साली दुष्काळामुळं शेतकऱ्याची परिस्थिती भयंकर हलाखीची झाली. अनेकाचा तंबाखू सुकून काळाठिक्कर पडला होता. त्या वेळी शेतकऱ्याच्या मनात एक वेडी आशा होती की अकोळचे सुपुत्र देवचंद शहा-ज्याची दानशूर म्हणून ख्याती, दुष्काळी परिस्थिती ध्यानात घेऊन तंबाखूला बऱ्यापैकी दर देऊन शेतकऱ्याची सोडवणूक करतील! त्या वेळी अकोळच्या शेतकऱ्यांनी एकत्र येऊन देवचंद शहाची भेट घेण्याचा प्रयत्न केला; पण गाठ पडू शकली नाही आणि मग चळवळ करण्याचा निर्णय घेणं भाग पडलं. त्या सुमारास गुजराथमध्ये नवनिर्माण आंदोलनानं पेट घेतला होता. आम्ही निपाणीत जाहीर केलं की, जर तंबाखू शेतकऱ्याचा प्रश्न सुटला नाही तर हा भाग गुजराथप्रमाणे पेटून उठेल ! देवचंद शहानी आमच्या ह्या चळवळीला भीक घातली नाही. कावळे भारमल ह्या पेढीनं मात्र भीतीपोटी थोडं-फार सहकार्य दिलं. ह्या पहिल्या चळवळीच्या निमित्तानं आम्ही खरेदी-विक्रीचे जे अन्यायकारक रिवाज होते, काडीमातीसूट, हवासूट वगैरे ते बंद करण्याचा प्रयत्न केला आणि त्यात आम्हाला थोडं-फार यश देखील मिळालं !'

मी विचारलं, 'अकोळला तंबाखू शेतकरी संघटित होत असतानाच निपाणीतील विडी आणि तंबाखू कामगार-स्त्रियादेखील संघटित होण्याच्या मार्गावर होत्या. त्या वेळीतुम्ही अकोळच्या तरुण मंडळीनी कामगार स्त्रियाच्या चळवळीला सहकार्य दिलं होतं का ?'

बेग म्हणाला, 'हो तर! सुभाष जोशीनी ही चळवळ हाती घेतल्यापासून अकोळच्या युवक संघानं त्यांना नेहमी साथ दिली आहे. आम्ही त्यांच्या बरोबरीनं काम केलं आहे. त्याचप्रमाणे जेव्हा जेव्हा आम्हाला सहाय्याची जरूर होती तेव्हा सुभाष जोशीनी नेहमी सक्रीय पाठिंबा दिला आहे. कामगार-स्त्रिया आणि अकोळचे तंबाखू उत्पादक शेतकरी ह्यानी कठीण प्रसंगी एकमेकांना नेहमीच सहाय्य केलं आहे आज ह्या आंदोलनाच्या वेळी तर सगळे तंबाखू उत्पादक शेतकरी आणि बारा हजार कामगार-स्त्रिया ह्यांची मजबूत एकी तुम्ही प्रत्यक्षच पहात आहात !'

मी प्रश्न केला, '१४ मार्चला 'रस्ता रोको' सुरू झाल्यानंतर कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांशी वाटाघाटी करण्यासाठी श्री. अण्णगुरुजींच्या नेतृत्वाखाली जे शिष्टमंडळ गेलं त्याचे तुम्ही सदस्य होता. त्या वाटाघाटीतून काय निष्पन्न झालं ? हा प्रश्न वाटाघाटीनं सुटणार का ?'

बेग काहीसा गंभीर होत म्हणाला, 'ह्याचं उत्तर देण्याअगोदर आणखी एक महत्त्वाचा मुद्दा ध्यानात घेणं आवश्यक आहे. ह्या आंदोलनामुळं तंबाखू शेतकरी इतर सर्व भेद विसरून एक झाला हा जसा मोठा फायदा झाला त्याचप्रमाणे खरेदी-विक्रीचे अन्यायकारक रिवाज इथून पुढं नक्की बंद होणार हा एक मोठा फायदा होणार ! वेगवेगळ्या 'सुटी'च्या नावाखाली व्यापाऱ्यानी अनेक पिढ्या शेतकऱ्यांवी चालविलेली लूट इथून पुढं बंद ! तंबाखूला योग्य दर मिळण्याअगोदरच ह्या 'सुटी' बंद होणार असल्यामुळे किलोमागे दीड-दोन रुपये वरचढ मिळणार !

'-आता बंगलोर इथं ज्या वाटाघाटी झाल्या त्याबद्दल विशेष काही बोलावं असं नाही. तशा प्रकारच्या वाटाघाटीतून कुठलाच प्रश्न सुटेल असं मला स्वत.ला वाटत नाही. ह्या असल्या वाटाघाटीमधूनन शेतकऱ्याच्या पदरात काहीच पडणार नाही. मुख्य म्हणजे हा प्रश्न राज्यसरकारच्या अधिकारातला नाही. ह्या बाबतीत केवळ केंद्र सरकारच निर्णय घेऊ शकतं. शेतमालाच्या दराचा प्रश्न अखेरीस वाटाघाटीतूनच सुटणार हे जरी खरं असलं तरी शेतकरी आता केवळ आश्वासनावर विश्वास ठेऊन आंदोलन मागं घेण्याच्या मनस्थितीत नाही, हेदेखील तितकंच खरं आहे. शेतकऱ्याला आता आश्वासनं नको, निर्णय हवा आहे !'

बेग जे सागत होता ते वस्तुस्थितीला धरून होतं. त्याच्याकडून आणखी काही नवीन मुद्दे मिळाले तर पहावं म्हणून मी सवाल केला-'तंबाखू आंदोलनाची पूर्वतयारी करण्यासाठी दोन महिन्यांपूर्वी शरद जोशीनी निपाणीला भेट दिली. सुभाष जोशीच्या घरी तीन दिवस अनेक कार्यकर्त्यांबरोबर चर्चा करून त्यांनी तंबाखूचा उत्पादनखर्च निश्चित केला. अकोळ, खडकलाट वगैरे ठिकाणी काही प्राथमिक स्वरूपाच्या सभा घेतल्या. निपाणीत शेतकरी आणि कामगार-स्त्रियांचा मेळावा भरवला. त्यानंतर आंदोलनाची दिशा निश्चित करण्यासाठी चिकोडी तालुका आणि आसपासच्या भागात त्यानी तीस-चाळीस सभा घेतल्या. त्या सर्वांचा परिणाम म्हणून आज

**शेतकऱ्याला आता आश्वासनं नको आहेत, निर्णय हवा आहे.**

शेतकरी एवढ्या प्रचंड तयारीनं आणि संख्येनं 'रस्ता रोको' आंदोलनात उतरला. गेली सात-आठ वर्षं तुम्ही आणि सुभाष जोशींनी जी जबरदस्त पूर्वतयारी केली त्यामुळंच हे आंदोलन इतक्या मोठ्या प्रमाणावर उभं राहू शकलं, ही महत्त्वाची गोष्ट विसरता येणार नाही. ह्या गेल्या दीड-दोन महिन्यांत शरद जोशींचा सहवास तुम्हाला आणि इतरांना मिळाला त्याचा विशेष असा काही फायदा झाला का ?'

बेग म्हणाला, 'निश्चितच झाला तरुण कार्यकर्त्यांना एक दिशा मिळाली. आजपर्यंत ह्या भागात काही ठराविक म्हातार्‍या पुढार्‍यांचंच वर्चस्व होतं. हे सगळे पुढारी देवचंदशेठच्या मुठीत होते. शरद जोशींनी ह्या भागाचा दौरा केल्यामुळं ताज्या दमाच्या तरुणांना आंदोलनात स्वयंस्फूर्तीनं उडी घेण्याची प्रेरणा मिळाली. आमच्या भागात दोन कॉलेजिस आहेत. कॉलेज पास झालेली, मॅट्रिकपर्यंत शिकलेली; पण नोकरी मिळत नसल्यामुळं गावातच राहून शेतावर काम करणारी अनेक मुलं आहेत. त्यांच्यावर शरद जोशींच्या विचाराचा विलक्षण प्रभाव पडला आहे. आज तंबाखू आंदोलनाला हजार-पंधराशे तरुण कार्यकर्ते त्यामुळंच उपलब्ध झाले आहेत. त्यांच्यातून उद्याचं नेतृत्व निर्माण होणार आहे !

'शरद जोशींनी इथं येण्यापूर्वी मी १४ डिसेंबर १९८० रोजी हैद्राबादला अखिल भारतीय शेतकरी संमेलनाला तंबाखू शेतकर्‍याचा प्रतिनिधी म्हणून गेलो होतो. महाराष्ट्रातून कुणीही आलं नव्हतं. तामीळनाडचे नारायणस्वामी नायडू ह्यांनी परिषद बोलावली होती. त्यांची संघटनासुद्धा मजबूत आहे. दहा-बारा वर्षांपासून ते काम करताहेत. तामीळनाडूमधील प्रत्येक खेड्यापर्यंत संघटना पोहचली आहे. कर्नाटकात बेळगावपर्यंत त्याचं लोण पसरलं आहे. त्यांच्या सहाय्यानं इकडची तंबाखू-चळवळ उभी करावी अशा विचारात आम्ही असतानाच शरद जोशी ह्या भागात आले.

'शरद जोशींची चळवळ लढविण्याची पद्धत नारायणस्वामी नायडूपेक्षा एकदमच वेगळी आहे. नायडू फार 'मिलिटंट' आहेत. त्यांच्या एकोणीस मागण्या आहेत. शरद जोशींची मागणी फक्त एकच आहे–एक कलमी कार्यक्रम, शेतकर्‍याच्या शेतमालाला त्याचा सर्व उत्पादनखर्च भरून निघेल असा दर. बस्स ! शरद जोशींच्या शास्त्रशुद्ध विचारसरणीतच आम्ही सगळे भारावून गेलो. आमचं दुखणं त्यांनी नेमकं हेरलं, त्याला नेमका उपाय सुचवला !'

ज्या भागात शरद जोशींच्या सभा होतात तेथील सर्व तरुण कार्यकर्ते बेग जे सांगत होता तेच सांगतात. मला हे नवीन नव्हतं. शरद जोशींचा विचार शेतकर्‍यांच्या तरुण मुलांच्या मनाची एकदम पकड घेतो हे मी पूर्वी अनेक ठिकाणी अनुभवलं होतं. बेगला मी म्हणालो–'आता शेवटचा आणि थोडासा वेगळा असा एक प्रश्न विचारतो. शरद जोशी ह्या भागात येण्यापूर्वी आणि तंबाखू–उत्पादक शेतकर्‍यांचं आंदोलन एव्हढ्या मोठ्या प्रमाणात उभं रहाण्यापूर्वी ह्या परिसरातलं गाजणारं एकमेव नाव म्हणजे सुभाष जोशी ! बारा हजार तंबाखू आणि विडीकामगार स्त्रियांची संघटना ही जगातील एक मोठी स्त्रीकामगार संघटना म्हणावी अशी. सुभाष जोशींचं व्यासपीठ मजबूत आणि प्रभावी. सुभाष जोशींनं कामगार-स्त्रियांचे दिलेले लढे गाजलेले–आता तंबाखू उत्पादक शेतकर्‍यांच्या आंदोलनामुळं एक नवं आणि ताकदवान व्यासपीठ ह्या परिसरात निर्माण झालं आहे त्या व्यासपीठाचा फायदा करवून घेऊन सुभाष जोशींचा प्रभाव कमी करण्याचा प्रयत्न केला जाण्याची शक्यता कितपत आहे ? शेतकरी आंदोलनामुळं चालून आलेली नेतृत्वाची संधी पटकावून सुभाष जोशींच कार्य दडपण्याचा प्रयत्न एखादा स्वार्थी कार्यकर्ता करेल का ? सुभाष जोशी आणि इतर तरुण कार्यकर्त्यांमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न होईल का ?'

बेग काही काळ विचारमग्न बसला आणि मग म्हणाला–'तुमचा प्रश्न महत्त्वाचा आणि गंभीर आहे. शेतकरी चळवळीमध्ये भाग घेणारे माझ्यासारखे कार्यकर्ते आणि सुभाष जोशी हे पूर्वीपासून एका पुरोगामी दृष्टिकोनातून एकत्र आलेले आहोत. आमच्या–आमच्यातच नेतृत्वाचा वगैरे प्रश्न उपस्थित झाला तर फूट पाडणार्‍याला नक्की यश येईल; पण आम्हाला कुणालाच नेतृत्वाची हौस नाही. त्यामुळे तो प्रश्नच निर्माण होणार नाही. आम्हाला निवडणुकीची, सत्तेची, खुर्चीची कसलीच अभिलाषा नाही. त्यामुळं आमच्यात फूट पाडणाराच बाजूला पडेल ! आमचं ध्येय एकच आहे. ह्या भागातील दरिद्री लोकांचं जे शोषण चाललं आहे ते थांबवायचं–मग ते शेतकरी असोत, शेतमजूर किंवा कामगार असोत. व्यापारी आणि दलालाची ह्या भागातील पकड कमी करायची, नाहीशी करायची हे आमचं मुख्य उद्दिष्ट आहे. त्यासाठी आम्ही सर्वांनी आमचं सामुदायिक नेतृत्व टिकवून धरणं फार महत्त्वाचं आहे. कुणी एकट्यानं ह्या आंदोलनाच्या यशाचं श्रेय स्वतःकडे घेण्याचा प्रयत्न केला तर तो फसणार आहे.

'हे आंदोलन सुरू होण्यापूर्वीच काही ठिकाणी फूट पाडण्याचा जोरदार प्रयत्न करण्यात आला हे देखील मी तुम्हाला स्पष्टपणे सांगू इच्छितो. काही ग्रामीण भागातील 'कार्यकर्ते' आमच्याकडे येऊन म्हणाले–'सुभाष जोशी कामगारांचा नेता आहे. त्याला तंबाखू शेतकर्‍यांच्या आंदोलनाच्या प्रचाराला कशाला पाठवता ?' आमच्याविषयीसुद्धा अशाच प्रकारची कुरबूर सुभाष जोशींकडे करण्याचा प्रयत्न काही 'कार्यकर्त्यांनी' केला. आम्ही अशा कार्यकर्त्यांना स्पष्टपणे बजावलं, 'तुमची समजूत साफ चुकीची आहे. शेतकर्‍यांचं आंदोलन सुभाष जोशींच्या सहकार्याशिवाय उभं रहाणं शक्यच नाही. त्यांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. व्यापार्‍यांची दादागिरी नाहीशी करायची असेल तर सुभाष जोशींच्या सहकार्याशिवाय ते शक्य नाही !' व्यापार्‍याच्या बगलबच्च्यांनी आमच्यात आणि आमच्याबद्दल शेतकर्‍यांच्या मनात गैरसमज निर्माण करण्याचे खूप प्रयत्न केले; पण त्यांना यश मिळालं नाही.

'सुभाष जोशींचं जे स्वप्न होतं की कामगार, शेतमजूर आणि शेतकर्‍यांनी एकत्र येऊन दलालांचा पाडाव करावा ते पुरं होण्याची वेळ आता आली आहे. आज ह्या आंदोलनात जे चित्र तुम्हाला दिसतंय ते ह्यापूर्वी इतरत्र कुठंही पहायला मिळालं नसणार अशी माझी खात्री आहे !'

¤

आंदोलननगरीतील एक रात्र. सर्वांची जेवणं आटोपली होती. गावोगावच्या छावण्यामधून भजन कीर्तनाचा कार्यक्रम सुरू झाला होता. घोळक्या-घोळक्यानं शेतकरी सुखदुःखाच्या गप्पागोष्टीत

रमले होते. शेतकरी संघटनेच्या तंबूशेजारी काही कार्यकर्ते एस. टी. चौगुलेच्याबरोबर गप्पा मारत बसले होते. शरद जोशी कुठं तरी गेले होते, त्यामुळं रोज रात्री भरणारी कार्यकर्त्यांची बैठक अजून सुरू झाली नव्हती. मंडळी शरद जोशींची वाट पहात 'उद्या'ची चर्चा करण्यात रंगली होती. एस. टी. चौगुले म्हणत होते,

'शरद जोशी अनेक भाषणांतून संताजी–धनाजीचा उल्लेख करतात. मोगलांच्या छावणीचे कळस कापून आणण्यासाठी संताजी-धनाजी जेव्हा निघाले तेव्हा उगाचच इकडच्या तिकडच्या शंका काढण्यामध्ये त्यांनी वेळ दवडला नाही. त्यांनी निर्धार केला आणि मोहीम यशस्वी करून दाखविली !

'आम्ही हा लढा सुरू केला तेव्हा शेतकरी सामील होतील का नाही ? त्यांची संख्या काय असेल ? सुरुवातीला मोठ्या संख्यनं जमलेली माणसं शेवटपर्यंत टिकतील का नाही ? ह्या असल्या शंकाकुशंकात अजिबात वेळ खर्च केला नाही. आमचा लढा न्याय्य मागण्यासाठी आहे ह्याची आमची स्वत.ची मनोमन खात्री असल्या-मुळं आम्ही निर्धारानं पाऊल उचललं आणि मग निर्माण होणारे प्रश्न आपोआप सुटत चालले. दाट धुक्यातून चालणाऱ्या माणसाला माहीत असत, समोर पंचवीस फूटच रस्ता दिसत असला तरी ते पंचवीस फूट पार केले तर पुढचे पचवीस फूट दिसणार. तेव्हा पहिले पंचवीस फूट पार केलेच पाहिजेत ! त्याप्रमाणे आम्ही ह्या आदोलनात पहिलं पाऊल टाकलं आणि आम्हाला पुढचा मार्ग दिसत गेला. अपेक्षे-पेक्षा जास्त प्रतिसाद मिळाला !

'अडचणी अनंत आल्या आणि इथून पुढं येणार; पण संकटाशी सामना करायचं ठरवलं तरच उपाय सुचतात. आज आंदोलनानं गंभीर स्वरूप धारण केलं आहे. वरकरणी हे शांत दिसत असलं तरी आत कुठं तरी ज्वालामुखीसारखी धग पेटते आहे. अनेक वर्षांच्या पिळवणुकीमुळं शेतकऱ्याच्या मनात अपार त्वेष साचला आहे, ह्यातून निश्चित मार्ग सापडणार अशी सर्वांची आता खात्री झाली आहे. यशाचं माप आमच्या बाजूला झुकू लागलंय. वाऱ्याची थंड झुळुक शरीराला जाणवते; पण दाखवता येत नाही तशी आज परि-स्थिती आहे. तंबाखू-धंद्यातील जाणकारांना पुढं काय होणार हे स्पष्ट दिसू लागलय !

'शेतकऱ्यांची जर खरोखर इच्छा असेल की, इथून पुढं आपली मुलंबाळं दलालाच्या दारात भीक मागण्यासाठी लाचारीनं उभी राहू नयेत तर त्यांनी सहकारी सोसायटी काढून त्यामार्फत तंबाखूची खरेदी-विक्री करण्यासाठी एकमतानं एकत्र येणं आवश्यक आहे. एकाच्या ठिकाणी दहा सोसायट्या निघाल्या तरी हरकत नाही; पण इथून पुढं ह्या व्यापार दलालाच्या हाती न रहाता शेतकऱ्याच्या हाती रहाणं महत्त्वाचं आहे. सोसायटीसाठी शेतकऱ्यांनी आपल्या भागा-तील जबाबदार आणि निःस्वार्थी माणसाची निवड करणं जरुरीचं आहे. सोसायटीचा लाभ तबाखू उत्पादक शेतकऱ्यालाच मिळाला पाहिजे हे ध्येय असलं पाहिजे.

'इथं काही जण एक शका काढतात; तंबाखूला दर मिळायला लागल्यामुळं सगळ्यांनीच जर जादा तंबाखू पिकवायचं ठरवलं तर काय होईल ? शका योग्य आहे. त्यावर विचार करण्याची जरूर आहे. ह्या बाबतीत माझं मत अस आहे, दर मिळू लागल्यामुळं प्रत्येक जण जादा तंबाखू लावून फायदा घेण्याचा प्रयत्न करील तर सगळंच गणित चुकणार आहे. ह्या वर्षी ज्यानं जेवढा तंबाखू लावलाय, त्याच्या नावावर जेवढे 'बोद' आहेत तेवढाच तंबाखू दरवर्षी त्याच्याकडून सोसायटी खरेदी करील अशा प्रकारचा नियम, अशा प्रकारची मर्यादा आपण स्वतःच घालून घेतली पाहिजे. असं जर केलं तर नियंत्रित उत्पादन आणि सोसायटीतर्फे खरेदी त्यामुळं शेतकऱ्याचा खरा फायदा होईल, एरवी नाही. आंदोलन सुरू आहे. त्याच पुढचं स्वरूप काय राहील हे जरी आता सांगता येत नसलं तरी अखरीस व्यापारी-दलालांना बाजूस सारून तंबाखूची खरेदी-विक्री करायची असेल तर सहकारी सोसायटीला पर्याय नाही हे आपण पक्कं ध्यानात ठेवलं पाहिजे !

'समजा हे आंदोलन फार दिवस लांबलं, आपल्याला रस्त्यावर बसून कंटाळा आला; पण घरी बसून तरी आम्ही काय करणार आहोत ? सहा महिने राबायचं, आठ रुपयं नावाला, हाती घ्यायचे पाच रुपये ! व्यापारी दहा टक्के आणि विडीकारखानदार पंचवीस टक्के फायदा घेत असताना आम्ही गप्पच बसून रहायचं काय ?

'समजा, सोसायटीतर्फे खरेदी केलेल्या तंबाखूवर प्रक्रिया करून त्याचा जर्दा बनवायचं आपण ठरवलं तर काय होईल ? ज्या तंबाखू कामगार-स्त्रियांनी आपल्याला इतका पाठिंबा दिला त्यांनाच आपल्या सोसायटीतर्फे चांगला रोजगार उपलब्ध होईल. प्रक्रिया केलेल्या जर्द्यापासून विडी वळायची ठरवलं तर आपल्याच भागातील विडी-कामगारांना काम मिळेल, चांगल्या दर्जाच्या विड्या तयार होतील. सेल्समन् एजंट म्हणून आमच्यामधील सुशिक्षित बेकार तरुणांनाच नोकऱ्या मिळतील. हे निव्वळ स्वप्नरंजन नाही. आपण जर निर्धारानं, एकमतानं, एकजुटीनं हे करायचं ठरवलं तर अशक्य काही नाही !

'अशा तऱ्हेने, तंबाखू पिकविण्यापासून त्याची विडी करून पूर्ण नफा पदरात पडेपर्यंत आपण सहकार्य करायचं ठरवलं तर ह्या धंदा आपल्याला जोपासणं अवघड आहे असं मला अजिबात वाटत नाही.

'हा व्यवसाय सुरू करण्यासाठी–सहकारी तत्त्वावर खरेदी-विक्री करण्यासाठी–लागणारे तीन–चार कोटी रुपये एका वर्षासाठी आप-ल्याला कर्ज म्हणून देणं सरकारला सहज शक्य आहे. तबाखूवर प्रक्रिया करून त्याची विडी बनवून विकण्यासाठी आवश्यक असलेल वीस-पंचवीस कोटी रुपयांचं भांडवल आपल्याला कर्ज म्हणून उपलब्ध करून देणंदेखील सरकारला शक्य आहे. सरकार विडीवर बसवलेल्या टॅक्सपोटी वर्षाला दोन–तीनशे कोटी रुपयं कमवतं त्या सरकारला तंबाखू उत्पादक शेतकऱ्याच्या आणि विडी तंबाखू-कामगार-स्त्रियांच्या फायद्यासाठी सवलतीच्या व्याजावर वीस-पंचवीस कोटी रुपयांचा कर्जपुरवठा करणं अवघड असण्याचं काहीच कारण नाही.

'आम्ही स्वावलंबी असाव, व्यापारी दलालाकडून आमची पिळवणूक होऊ नये अशी सरकारची खरोखरच इच्छा असेल तर सहकारी सोसायटी आणि प्रक्रिया व विडी-उत्पादनासाठी आम्हाला कर्जपुरवठा करण्यास सरकारला कसलीही अडचण आहे असं आम्हाला वाटत नाही.

'समजा, सरकारनं आपलं म्हणणं मान्य केलं तर सर्व तंबाखू-उत्पादक शेतकऱ्यांना रास्त दरानं तबाखू पिकवायचा सोय झाल्यानंतर मिळालेल्या रकमेतून दहा टक्के शेअर घेणं जरुरीचं आहे. व्यापारी दलाल पचवीस-तीस टक्क्यांच्यावर लुटत होते. ती लूट थांबली तर शेतकऱ्यांनी दहा टक्के पैसे शेअरसाठी स्वखुशीनं दिले पाहिजेत असं मला वाटत. दलालाच्या हाती जाणारा पैसा शेअरसच्या रूपानं शेतकऱ्यानं सोसायटीकडे जमा केला तर चार-पाच वर्षांत आपल्याला सरकारी कर्जाची आवश्यकतादेखील भासणार नाही !'

एस. टी. चौगुलेंनी मांडलेल्या मुद्द्यावर कार्यकर्त्यांत बरीच उलट-सुलट चर्चा सुरू झाली. मला मात्र एस. टीं. चं एक वाक्य एकदम पटलं होतं 'धुक्यातून जायच असेल तर पहिलं पाऊल उचलल्यावरच पुढचा मार्ग दिसणार !' (क्रमशः)

( पुढील अंकी शेवटचा लेख )

पुस्तके

# चुंबक शक्तधुंद 'मातावळ'

प्रख्यात नेपथ्यकार, चित्रकार, चित्र व शिल्प-कलेचे मर्मज्ञ समीक्षक दत्तात्रय गणेश गोडसे यांच्या नव्या पुस्तकाचे नाव आहे 'मातावळ'! मग मी या लेखाला शीर्षक देताना 'शक्तधुंद' हा शब्द का वापरला असावा, त्याचा आणि चुंबकाचा संबंध काय, असा प्रश्न मनात येईल; परंतु या पुस्तकाचा विषयच मुळी नैसर्गिक चुंबकाची चराचरात भरून राहिलेली आणि पृथ्वीवर व पृथ्वी-वरील सर्व गोष्टींवर हुकुमत गाजवणारी शक्ती, असा आहे. श्री. गोडसे यांच्या 'लोकधाटी' या पुस्तकालाच हे पुस्तक पुरवणी म्हणून जोडता येण्यासारखे असावे, असे हे पुस्तक वाचून वाटते.

आदिमानवाची चित्रे व शिल्पे, आदि-वासींची आजही आढळणारी, दिसणारी शिल्पे, तसेच ग्रामीण शिल्पे, एवढेच नव्हे, काव्येही या चुंबकाच्या शक्तीने भारली गेली असतात हे सांगणे हा या पुस्तकाचा उद्देश. हा चुंबक म्हणजे अर्थातच पृथ्वीच्या पोटामध्ये दक्षि-णोत्तर पसरलेला, अस्तित्व असलेला पण न दिसणारा प्रचंड शक्तिमान असा आहे आणि या चुंबकाचा प्रभाव माणसावर फार मोठ्या प्रमाणावर पडला आहे, हे सिद्ध करण्याकरता हा पुस्तक-प्रपंच.

वर उल्लेख केलेल्या आदिवासींच्या शिल्पांना श्री. गोडसे 'लोकधाटी आविष्कार' असे म्हणतात. अर्थातच जगातील सर्व प्राचीन शिल्पे या प्रकारात असतात. या शिल्पामध्ये कोरीव-रेखीवपणा, सुबकपणा नसतो. एखादी 'मूर्ती' म्हटल्यावर आपल्या डोळ्यांसमोर जे दिसते तसे सौष्ठवही यात नसते. मग ती 'वाक-वळणाचे चलन असलेली स्वयंप्रवाही रेषा' श्री. गोडसे यांचे अधि-काधिक लक्ष वेधू लागली. 'लोकधाटी' या पुस्तकानंतरसुद्धा त्यांच्या मनात तोच विचार चालू होता. ते म्हणतात, 'वाक-वळणांचे मूळ घडणप्रक्रियेच्या गतिमानतेत आहे हे लक्षात आले होते; पण गतीमुळे वाकांची निर्मिती नेमकी कशी होते? या निर्मितीला फक्त गतीच कारणीभूत आहे की आणखी एखादी अदृश्य शक्ती कारणीभूत आहे याचा बोध होत नव्हता आणि हा बोध झाल्या-शिवाय विचाराची पुढील दिशा सापडणे कठीण होते. विचारप्रवाह एखाद्या भोवऱ्यात सापडावा तसा स्वतःभोवती फिरत होता.' विचारांची अशी स्थिती असतानाच मध्य-अमेरिकेतील या उत्खननाविषयीचे वृत्त श्री. गोडसे यांच्या वाचनात आले. या उत्खननात सापडलेल्या प्राचीन मूर्तीचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्यामध्ये अंगभूत लोहचुंबक आहे. तसेच चुंबकीय दगडाची मान व तोंड असलेले एक दगडी कासवही सापडलेले आहे. दगडामधील चुंबक त्या प्राचीन शिल्पकारांना कसा बरे सापडला असेल? कासव हे सागरात प्रवास करणारे आहे. त्याच्या मानेमध्ये असलेल्या चुंबकीय शक्तीचा होकायंत्राप्रमाणे उपयोग होऊन त्याला दिशाज्ञान होत असेल काय? व त्याचसाठी मानेत चुंबक असलेले दगडी कासव कोरले गेले असेल काय? असे प्रश्न श्री. गोडसे यांच्या मनात उभे राहतात आणि त्यांची उकल करण्याच्या दृष्टीने ते प्रयत्न करू लागतात.

याच्यानंतर आपल्याला किंचितशा विस्क-ळितपणे पृथ्वीची रचना, वातावरणाची थोडीशी रचना, चुंबक व चुंबकीय शक्ती, भूगर्भातील चुंबक व त्याचा प्रभाव किंवा प्रभावक्षेत्र वगैरेसंबंधीची शास्त्रीय माहिती त्रोटकपणे मिळते. त्याचप्रमाणे नद्या व रस्ते (अवघड घाटमाथ्यासह), त्यांची वळणे व प्रवाहही पृथ्वीच्या दुहेरी गतीमुळे—स्वतः-भोवतीच्या व सूर्याभोवतीच्या फिरण्यामुळे मिळणारी—आणि भूगर्भातील या चुंबकाच्या शक्तीमुळेच बदलली जातात, असाही एक मुद्दा येथे उपस्थित केला गेला आहे. तसेच होकायंत्राचा इतिहासही त्रोटकपणे सन-सनावळ्या न देता दिला गेला आहे. मानवी जीवन व हा 'विराट अगोचर शक्तभार चुंबक' यांचा कसा जवळचा संबंध आहे तेही श्री. गोडसे यांनी आपल्या या पुस्तकात विस्तारपूर्वक सांगितले आहे.

परंतु लोकधाटी कलाआविष्कार व चुंब-काचा संबंध काय, असा प्रश्न वाचकाच्या मनात स्वाभाविकपणे येतो. त्याचे उत्तरही लेखकाने दिलेले आहे. 'खरे सांगायचे तर हा संबंध मलाही त्या वेळी स्पष्ट होत नव्हता. पण मनातून मात्र जाणवायचे की हा संबंध नक्की आहे. वास्तवात ते जाणवणे नव्हते... तर भावणे होते. आणि लोकधाटी आविष्का-रात आणि व्यवहारातही, या भावण्याला फार महत्त्व! दोन्हीही 'भावन' अनुसारी, केवळ युक्तिवादाने भावनाचे आकलन होणे कठीण. उलट आकलन झाल्यावर त्याचे सम-र्थन युक्तिवादाने करणे सोपे, म्हणून आपणही त्याची उकल भावन—अनुसाराने करावी असे मत झाले.

'लोकधाटी व्यवहार व आविष्कार यांच्या संदर्भात विचार करताना लोकधाटी व्यवहार व आविष्कार नेहमी पूर्णाचाच मागावा घेतात...पूर्णाच्या विभागाचा म्हणजे तप-शिलाचा विचार ते करीत नाहीत असा अनु-भव नमूद केला होता.

'त्यामुळे वाटले की, वाक—वळणाच्या लोकधाटी चलनाचा शोध घ्यायचा तर तो लोकधाटी आविष्काराच्या भावविश्वातील 'पूर्णा'त घ्यायला हवा. या पूर्णामध्ये जर चुंबक दडलेला असेल तर त्याच्या प्रभावाशी लोक-आविष्कारातील वळण—चलनाचा संबंध सापडणे शक्य. लोक—आविष्काराचे भाव-विश्व हे भूमीशी निगडीत. तेव्हा त्याचे पूर्णही भूमीशीच निगडित! या पूर्णातील चुंबक शोधायचा म्हणजे भूगोलांतर्गत प्रचंड चुंबक शोधायचा'. या चुंबकाचा शोध हा या पुस्तकाचा पहिला भाग आहे.

दुसऱ्या भागात नदीच्या प्रवाहात सापड-लेल्या दगडाविषयीची माहिती आहे. तिव-ळणी, अर्धगोखुरा व अडगालाकृती दगड कसे बनतात, दगडाच 'आकार-अंग व त्या दोघांना सावरणारा घाट' कसा बनतो, याचे श्री. गोडसे यांनी विवेचन केले आहे. त्यामुळे संगीता-तील लय व तालतत्त्वही विस्तारपूर्वक येते. सृष्टिमान्य निर्मितीचे सौष्ठवसूत्र भूगोलांतर्गत

चुंबकाची आकर्षणशक्ती व पृथ्वीची दुहेरी गती यांनी नियंत्रित कसे असते, गतिमानता व अनियमतता व सृष्टीचे भावविश्व हेच मानवी लोकधाटी आविष्काराचेही भावविश्व कसे असते, ते उदाहरणांसहित स्पष्ट करणारा पुस्तकाचा तिसरा भाग आहे.

या तिसऱ्या भागात ग्रामीण गीत आहे व एका प्राचीन सुन्दर कोरीव पण उध्वस्त योगिनी मंदिराच्या शेजारील ओबडधोबड स्वरूपाच्या आदिवासी 'शक्ती' शिल्पाचे वर्णन आहे. ग्रामीण गीतात कंसवधाचे वर्णन येते. मथुरेला कृष्ण वैराळाचे रूप घेऊन गेला होता ही नवीन माहिती मला या गीतातून कळली. हे गीत भूमिनिष्ठ, साधे सरळ सौन्दर्यपूर्ण कसे आहे ते लेखकाने स्पष्ट केले आहे. त्यांच्या पूर्वीच्या 'लोकधाटी' या पुस्तकातही हेच गीत आहे, पण या नव्या संदर्भात या गीतातील काही ओळीचा अर्थ कसा वेगळा लागतो तेही इथे सांगितले आहे.

योगिनी मंदिराशेजारच्या आदिवासी शिल्पाचे वर्णन व विश्लेषणही मनोवेधक आहे. विशेषत: योगिनी मंदिरातील स्त्रीमूर्ती कोरीव देखणी का व आदिवासी स्त्रीमूर्ती ओबडधोबड का याचे श्री. गोडसे यांनी केलेले विवेचन फारच सुरेख आहे. आदिवासी शिल्पकाराला 'स्त्री' ची मूर्ती कोरायची नसून 'शक्ती' ची मूर्ती कोरायची होती हे पटण्यासारखे आहे. अर्थात हे सगळे मुळातूनच वाचायला हवे. त्याचे उतारे देणे योग्य नव्हे व त्याना जागाही पुरी पडणार नाही.

तर असे हे एक पूर्णपणे वैयक्तिक पुस्तक आहे. चराचरात भरून राहिलेल्या मानवाच्या प्रत्येक हालचालीचे भावाविष्काराचे नियंत्रण करणाऱ्या शक्तीमातेवर हे पुस्तक आहे आणि म्हणून त्याचे नाव 'मातावळ' असे आहे. अर्थात हे आपल्याला अगदी शेवटी स्पष्ट होते. या पुस्तकात मांडलेली मते लेखकाची अगदी पूर्णपणे वैयक्तिक आहेत हे लक्षात घ्यायला हवे. कोणताही ग्रह मनात न ठेवता स्वच्छपणे पुस्तक वाचल्यास आपल्या जीवनातल्या प्रत्येक गोष्टीत 'चुंबक' येतो हे आपल्यालाही मान्य होईल. भूमिनिष्ठ, सौंदर्यवादी साध्या जीवनाचे श्री. गोडसे भोक्ते असल्याचे या पुस्तकातून जाणवते आणि चुंबकाच्या त्या एका कल्पनेने ते पूर्णतया भारून गेल्याचेही, त्याच्याच शब्दात सांगायचे तर. 'शक्तधुंद' झाल्याचेही या लेखनातून जाणवते. लेखन मुक्त, काहीसे वहावत जाणारे आहे; पण ही सगळी 'टाचणे' आहेत असे त्यांनी प्रारंभीच सांगून ठेवल्यामुळे आपल्याला त्याबद्दल दोष देता येणार नाही.

परंतु या लेखनातील दोष म्हणजे भाषेचा तितकाच अवजड, बोजड, क्लिष्टपणा ! त्यामुळे एवढ्या सौंदर्यपूर्ण विषयाला अशी कंटाळवाणी भाषा श्री. गोडशानी का वापरली आहे ते कळत नाही. त्यामुळे त्यांना काय म्हणावयाचे आहे ते कळायला थोडा वेळ लागतो. त्यामुळेच हे ५५ पानी पुस्तक संपायला जरा जास्तच वेळ लागतो. या पुस्तकाचा उद्देश स्वत: लेखकाने स्वतंत्रपणे प्रस्तावनेत देणे आवश्यक होते. लेखकाचीही थोडक्यात माहिती आवश्यक होती. ते असो. त्यांच्या अवघड भाषेचा एक तुकडा पहा : 'संग्रह केलेल्या नदीतल्या विशेष दगडांचा आकार घाटांचे सौष्ठव सृष्टिमान्य घडण प्रक्रियेनुसार कसे मिळते ते पाहिले,दगडांच्या आकार-घाटाचे निरीक्षण करून त्यांच्या घाटाच्या, घाटाच्या अंगभूत चलनाचा व त्यांच्या आकारातील वाक-वळणांचा अभ्यास केल्यावर स्पष्ट झाले की, सृष्टिमान्य निर्मितीचे सौष्ठवसूत्र भूगोलातर्गत चुंबकाची आकर्षणशक्ती व भूगोलागभूत दुहेरी गती यानी नियंत्रित असते.' इ. इ. आता येथे 'भूगोलागभूत' या शब्दाऐवजी 'पृथ्वीची' हा शब्द वापरता नसता आला काय ? तसेच 'शक्तभार', 'शक्तधुंद'हेही श्री. गोडसे यांनीच coin केलेले शब्द असावेत असा अंदाज आहे. ही शक्तधुंदी एक्टी की लेखकास दगडाचा प्रत्येक कण भारलेला, झपाटलेला, गतिमान, शक्तधुंद असल्याचे सूक्ष्म निरीक्षणाअंती जाणवते; पण ते वैयक्तिक मत आहे आणि चुंबकाचे तंत्र प्रत्येक ठिकाणी लावणे योग्य की अयोग्य ? 'चुंबक शक्तधुंद' नजरेने प्रत्येक भावाविष्कार मग तो 'लोकधाटी 'चा असो किंवा 'शास्त्रधारी नागरी' असो, तपासून त्याचे स्पष्टीकरण किंवा विवेचन करणे बरोबर की चूक, हे त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञच ठरवतील. आपण मात्र धीर धरून कसोशीने हे पुस्तक पूर्ण वाचावे. एका नव्या विषयाची ओळख नक्कीच होईल आणि मराठीमध्ये अशा प्रकारचे पहिलेच 'प्रामाणिक, वैयक्तिक' पुस्तक. तेव्हा जरूर वाचावे !

— निखिल गजेंद्रगडकर

मातावळ
ले. द. ग. गोडसे
पॉप्युलर प्रकाशन
पृष्ठे ५५

---

## फिनिक्स निवड

# The Serengetti Lion

A Study of Predator-Prey Relations

By George B, Schaller.

[ National Book Award winner, Pages 480, $ 9.95 ].

---

एकदा मेळ खाल्ली की कशी चटक लागते! बरेच सिनेमे पाहिले की त्याचीसुद्धा सवय लागते ! पुष्कळ दिवसानी लागोपाठ परगावी हॉलीडे घेतला की नंतर पायाला भिंगरी लागल्यासारखे होते. हे पुस्तकखरेदीचे असेच ! सेकड नेचर होऊन बसते. तुम्ही कैलास सखालाचे 'टायगर' नावाचे पुस्तक घेता. ते तुम्हाला फार आवडते. याच धर्तीवरचे तुम्ही जॉर्ज शॅलरचे 'सेरेंजेटी लायन' पुस्तकाच्या दुकानात बघता. बरीच पुस्तके विकत घेऊन आता पुस्तकाच्या बाबतीत तरी तुम्हाला क्ष–किरण-दृष्टी लाभली आहे. पुस्तक थोडेसे चाळून तुमच्या लगेच लक्षात येते की हे एक अप्रतिम पुस्तक आहे. आपल्याकडे 'टायगर' वर पुस्तक आहे, तर 'लायन' वर का असू नये ? असा तर्कशुद्ध किंवा तर्कसंगत विचार लगेच येतो आणि मग तुम्ही अर्कतीर्थासारखे 'रॅशनलाईझ्' करायला लागता. एक प्रकारचे (नेहमीचे) आत्मसमर्थन पुढे येते, 'मला इतर काही व्यसन नाही. मी सिगरेट ओढत नाही, मी वाइन किंवा व्होर्स (whores) ना शिवत नाही ! मग हे पुस्तक मी घेणार!' असा तुम्ही ठामपणे विचार करता व पुस्तक शंभरेक रुप-

यांच्या आसपास असेल तर तुमच्या चेहऱ्यावर कठोर व करारी निर्णयात्मक भाव दिसायला लागतात आणि रोखीने किंवा चेकने पैसे देऊन तुम्ही आनंदाने दुकानाबाहेर पडता. ही एक आत्मवंचना असते. कारण खेदाची गोष्ट ही की, कोणत्याही व्यसनापेक्षा आता पुस्तक-खरेदीचं व्यसन महाग होत चाललं आहे. (कोणत्याही वस्तूसाठी पुष्कळसे रोख पैसे देताना अवघड होते, पण चेकने मात्र तसे होत नाही. तुमच्या डोळ्यासमोर एक कागदच असतो. मोटा नसतात. म्हणूनच आम्ही फिनिक्समध्ये एक 'चेक्स ॲक्सेप्टेड' अशी पाटी लटकावून ठेवली आहे !)

आम्ही डहाणूत लहान असताना वडिलांबरोबर कधीकधी लाकडाच्या धंद्यात प्रख्यात असलेल्या सावटा गावी जायचो. रात्री परतताना टांग्याला फक्त दोन कंदील असायचे. थंडीच्या दिवसात ७॥–८ ला परतायचो. ही मध्यरात्र आहे की काय, असे वाटायचे. रस्त्यात कुठेच दिव्याचा मागमूस नसायचा. बैलगाड्यांची वर्दळ याही वेळी असायची. चुकून एखादा ट्रक बैलगाडीच्या समोरच्या दिशेने यायचा. ट्रक पुष्कळ लांब असताना दोन बैलांचे ते चार डोळे असे काही फॉस्फरससारखे चमकायचे की मी ते कधीच विसरणार नाही ! कधीकधी टांग्याच्या कंदिलाच्या प्रकाशातसुद्धा असे व्हायचे. प्रकाशस्रोत जसजसा लांब जायचा तसतसे कुट्ट अंधारात फक्त चार डोळेच रहायचे. चेशायर कॅट गेल्यानंतर तिचे फक्त हास्यच कसे रहायचे ? तसेच ! सिंहाचे डोळे व प्रत्येक प्राण्याचे डोळे अंधुक प्रकाशात असेच चमकताना मी पाहिले आहे.

(चेशायर कॅट आठवली की मला टी.व्ही. आठवल्याशिवाय रहात नाही. लुई (Lewis) कॅरॉलची किमया टी. व्ही. लेन्समनला जमायची नाही. प्रत्येक अनाउन्सर व बातम्या देणाऱ्याला शेवटी हसावे लागते. बरं हसूव लगेच इमेज गेलं तर ठीक, पण कॅमेरा इतका वेळ रेंगळतो की T V मधल्या लोकाना अडचणीत आल्यासारखे वाटते ! T V मध्ये एका भाग घेणाऱ्याला तर शेवटी कॅमेरा रेंगळल्यामुळे मी अक्षरशः डोळे गरगर फिरवताना पाहिला. निदान सरिता सेठीसारख्या बातम्या देणाऱ्यांच्या बाबतीत तरी कॅमेरा पटकन काढून घ्यावा !)

याआधी 'सिंहा' वरचं मी एक 'व्हाइट लायन्स ऑफ तिंबावती' हे पुस्तक घेतले होते व त्याचा परिचय २–८–१९८० च्या 'माणूस' मध्ये दिला होता. हे क्रीस मॅकब्राईड चे पांढऱ्या सिंहावरचे पुस्तकही एक बर्फाचा तुकडाच आहे. छपाई, रंगीत चित्रे, टाइप सेटींग वगैरेची तुलना जॉर्ज शेलरच्या पुस्तकाशी केली तर क्रीस मॅकब्राइडचं पारडं निश्चित झुकेल ! शेलरच्या पुस्तकाला नॅशनल बुक ॲवार्ड मिळाले आहे तरी.

याचे मुख्य कारण म्हणजे 'द सेरेंजेटी लायन' हे एक अती अभ्यासू पुस्तक आहे. टू परफेक्ट ! (Hence a little dull ?) रंगीत चित्रे तर नाहीच ! त्याशिवाय 'नेचर इज रेड इन टूथ ॲंड क्लॉ' हा असर येणार कुठून ?

काहीही लिहून झाले तरी असे म्हणावे लागेल की, जॉर्ज शेलरचे हे पुस्तक म्हणजे सिंहाचा अशा तऱ्हेचा एक अभ्यास आहे की, तसा दुसऱ्या कुणीही केला नाही. म्हणजे जनुकांचा एक अपघात. त्यामुळे हा एक शेषअभ्यास आहे; परंतु जॉर्ज शेलरचा एक संपूर्ण अशेष अभ्यास आहे. अर्थात शेष हा कितीही रंगीत आकर्षक असला तरी तो अशेषपेक्षा कधीही मोठा होऊ शकत नाही.

डॉ. पूर्णपात्र्यांचे 'सोनाली', प्रा. सौ. मेधा काळे (या Ph. D. च्या डॉ. ही आहेत की काय ते माहीत नाही.) यांचे 'गीर, गिरनार, गरवा,' जॉय ॲडॅमसनची 'बॉर्न फ्री; लिव्हिंग फ्री' W. Mac Arthur चे 'Simba Bwana,' 'Wild life of India', 'Serengetti Shall Not Die' वगैरेही सिंह या प्राण्यावरची पुस्तके फिनिक्समध्ये आहेत. ती परत परत हाताळावीशी, चाळावीशी, वाचावीशी वाटतात. काही पुस्तके अशी असतात की, अथपासून इतीपर्यंत वाचायची नसतात. काहीचा प्रारंभ शेवटापासून करावयाचा असतो. काही मधेच उघडून बघायची असतात. असे केल्याने आपल्या वाचनाच्या भुकेला तीव्र धार चढत असते.

प्राण्यातही आपापसात वैमनस्य असते, हे सर्वांना माहीत आहेच; पण कधीकधी ते पद्धतशीर असते. एकदा एका हत्तीच्या पिल्लाला एका सिंहाने मारले. हत्तीबाबाला ते कळले व त्याने त्या सिंहाचा पाठलाग केला आणि त्याचे पिल्लू हुडकून काढून ते त्याच्या पायाखाली चिरडून टाकले.

वाघोबावर किंवा सिंहावर कोणतेही पुस्तक आमच्या ग्रंथालयात आले की, मला या दोन प्राण्यांची तुलना केल्याशिवाय रहावत नाही आणि या तुलनेत वाघोबाला मी नेहमीच झुकते माप देत असतो. थोड्या दिवसानंतर वाघोबावरील एका पुस्तकाचाही परिचय करून देणार आहे.

सिंह हा फार खादाड असतो. असे म्हणतात की, पक्ष्याना त्यांच्या वजनाच्या तिप्पट खावे लागते ! (काय पण भन्नाट चयापचय-क्रिया!) हा 'जंगलचा राजा' इतका खादाड असतो की त्याला त्याच्या वजनाच्या एकचतुर्थांश मांस लागते आणि कधीकधी तेसुद्धा बायकोने कमावलेल्या संपत्तीतून ! मादी पण काय कमी असते ? शिकार केली की स्वतः पहिली खाणार ! पिल्ले नंतर. वाघिणीचं अगदी उलट ! सिंहाला चाळीस किलो मांस लागते. पोटामधील कोथळ्यातील काही भाग, फुप्फुसे, खूर, अति जाड हाडे वगळता बाकीचे सर्व काही सिंह फस्त करतो ! नाकाच्या मागील कोवळी हाडे असतात तीसुद्धा तो खाऊन टाकतो

झेब्रानी लाथ मारल्यामुळे काही बेसावध सिंहराजाचे थोबाड फुटते, हे या पुस्तकात वाचून आश्चर्य वाटले.

या पुस्तकात भरपूर छायाचित्रे आहेत. सिंहाची तर आहेतच; पण इतर प्राण्यांचीसुद्धा आहेत. त्याशिवाय आफ्रिकेतील कित्येक नॅशनल पार्क्सची माहिती आहे. बबून्स, चित्ते, कित्येक पक्षी, नरभक्षक सुसरी, हत्ती अनेक प्रकारची हरणे, तरस, जिराफ, झेब्रा, हिप्पोपोटॅमस, कोल्हे, जंगली कुत्रे, साळिंदर, थॉमसन गझेल (एक अप्रतिम सुन्दर हरीण), वाइल्डबीस्ट (याला gnu नू पण म्हणतात, त्याला घोड्यासारखी आयाळ व शेपटी असते.) बैलोबा व साबर कंबाइन्ड म्हणजे वाइल्डबीस्ट ! आणि इतर अनेक पात्रे सेरेंजेटी नॅशनल पार्कच्या पडद्यावरून या पुस्तकात फिरतात.

पण फिरून फिरून परत येते ते मेट्रो गॉल्डवीन मेयरच्या अर्धवर्तुळातून डरकाळी फोडणारे पात्रच !

—जे. एन. पोंडा

# पुणे वार्ता

मुखपृष्ठ २ वरून

---

नाही.' प्रत्यक्ष निवडणुकीत अॅड. सुरेश तोर यांना सर्वाधिक मतं पडली. कारण सर्वांनी 'शब्द' पाळला. डॉ. देसाईंच्या निवडणुकीत कॉंग्रेस (अरस) मधील काहींनी जातीय भूमिकेतून श्री. केशवराव पवारांना मतं टाकली.

नव्यांना याची थोडीफार कल्पना असावी. कारण ऐनवेळी कॉंग्रेस (आय)ची सात मतं फुटली. ती डॉ. देसाईंना मिळाली आणि ते विजयी झाले. तिथपासून या नव्या गटाला 'यंग गॅंग' संबोधण्यात येऊ लागले. यामध्ये कॉंग्रस (आय), भाजप आणि नागरी संघटनेतर्फे नव्याने निवडून आलेल्या नगरसेवकाचा समावेश होता. त्याची संख्या वीसपर्यंत गेली होती. दर शनिवारी याची बैठक होत असे. म्हणून पुढे याच गटाचं नाव 'सॅटरडे ग्रुप' असं पडलं.

गेल्या वर्षी स्थायी समितीच्या अध्यक्षाची निवडही 'गोल्डन गॅंग'चा पाडाव करण्याच्या भूमिकेतून झाली. श्री. काका वडके या भाजपच्या उमेदवाराला कॉंग्रेस (आय) च्या सभासदानी मते दिली. 'जनता'चे डॉ. तोडकर पडले. त्यानतर वाहनव्यवहार समितीच्या अध्यक्षपदी शिवाजीराव पेठकर याची निवड झाली. यातही 'गोल्डन गॅंग'चे थोडं सहाय्य घेतले गेले.

पण या सपूर्ण वर्षात 'गोल्डन गॅंग' पराभूत होत होती तरी त्यानी आपले आसन पुन्हा जमवायला सुरुवात केली; तर 'सॅटरड ग्रुप' बद पडत गेला. प्रथम आपल्या ग्रुपमधल्या सर्वांना कोणते ना कोणते पद मिळाले पाहिजे, असा उपमहापौर डॉ. देसाई याचा सूर होता. हळूहळू नाराजी वाढू लागली. उपमहापौर मदत करत नाहीत अशी तक्रार यऊ लागली. अखेर आस्ते आस्ते काही जण ग्रुपमधून बाहेर पडले. हे 'गोल्डन गॅंग' ने हेरले. सुरेश आगरवाल, सुरेश शवाळे हा मडळा रामभाऊ मोक्षे, शकर निम्हण, उल्हास ढोले पाटील, शशिकात सुतार याच्या सहाय्यान वॉर्डातील काम करून घऊ लागली.

'गोल्डन गॅंग'ला संधी मिळाली ती शिक्षणमडळाच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकातून. श्री. वीरदास चव्हाण निवडले गेले ते अपक्षाच्या सहाय्याने. माजी महापौर पांडुरंग तरवडे यांनी श्री. गजानन गांजवेसाठी केलेले प्रयत्न फुकट गेले. श्री. तरवडे यांच्या वेगळया ग्रुप करण्याच्या प्रयत्नांना हादरा बसला. वाहनव्यवहार समितीच्या अध्यक्षपदी शिवाजीराव पेठकर यांना त्यांनीच आणलं; पण इथे त्याचे आराखडे इतके चुकले की बहुमत असूनही कॉंग्रेस(आय)च्या उमेदवाराला आठ तर जनताच्या व मित्र पक्षाच्या गाजवेना पाच मते मिळाली. नागरी संघटना आणि जनताच्या उमेदवारांनी 'गद्दारी' केली, यातील जनताच्या भगवान देडगावकरांची तर पक्षाने हकालपट्टी केली!

महापालिकेत सध्या कॉंग्रेस (आय) २३, भाजप १३, नागरी संघटना ९, जनता ८, कॉंग्रेस (अरस) १२ व इतर १० अपक्ष. यात प्रत्येकी दोन शिवसेना, रिपब्लिकन आहेत. ऐनवेळी कॉंग्रेस(आय)कडून सुरेश आगरवाल यांना सांगितले गेले की, पक्षातून चार मते मिळतील. बाहेरून काही मतं तुमच्या जोरावर मिळवा. सुरेश आगरवाल अपक्ष म्हणून महापालिकेत निवडून आले व कोणतीही अट न घालता कॉंग्रेस (आय)-मध्ये सहभागी झाले. त्यांचा या वेळी 'क्लेम' होता; परंतु अली सोमजी व प्रकाश पवार याना उमेदवारी दिली गेली. अली सोमजी या तरुण नगरसेवकाला कोणतेही पद मिळालं नव्हतं. त्यामुळं त्याला उमेदवारी मिळणे रास्त होतं. सुरेश आगरवाल यांनी अपक्ष गटातून चार मताचं आश्वासन मिळवलं. तेवढयात श्री. उल्हास काळोखे यांनी शिवसेना सोडली. त्यामुळे या निवडणुकीत ते कुठे हा प्रश्न होता; पण ते अपक्षांना मिळाले.

प्रत्यक्ष निवडणुकीच्या वेळी अपक्ष गटातील ज्येष्ठ नगरसेवकांनी कॉंग्रेस (आय)च्या नेत्यांना दम भरला. आमचे तेज पारवानी पडले तर शिक्षणमंडळात अविश्वासाचा ठराव आणू! शिवाय महापौर–उपमहापौर निवडणूक आहेच. बघा! थोडक्यात कॉंग्रेस (आय)ची मते सुरेश आगरवाल याना मिळू नयेत. झालेही तसेच. मात्र आश्वासन दिल्याप्रमाणे अपक्ष गटाकडून चार मते मिळाली. पक्षाकडून व ज्यांची चार मते मिळणार त्यांच्याकडून हा खुलासा मिळाला.

जनताच्या श्री. बबन बिवबे याचा 'मामा' होणार हे आधीच दिसत होते. त्यांना आठपैकी साडेसात मतं पडली. आता स्थायी समितीत कॉंग्रेस (आय) ४, कॉंग्रेस (अरस), भाजप., नागरी संघटना प्रत्येकी दोन, जनता, अपक्ष प्रत्येकी एक असे बलाबल झाले आहे.

आता शरद पवार 'अरस'मध्ये राहणार हे निश्चित झाले. साहेब कॉंग्रेस 'आय' मध्ये अगोदरच गेले. या पार्श्वभूमीवर आगामी महापौर-उपमहापौर–निवडणुका कशा होतील हे कुतूहलच आहे. कारण सध्याच्या वातावरणानुसार 'अरस'मधील १२ पैकी ८ नगरसेवक कॉंग्रेस (आय)मध्ये जातील असा अंदाज आहे. अर्थात प्रत्येकाला काही तरी हवे आहेच. कॉंग्रेस (आय)चे २३ आणि हे आठ जण धरले तर ३२ नगरसेवक होतात. त्यामुळे आणखी मित्रपक्ष व इतर मिळवले तर महापौरपद त्याच्याकडे जाईल.

सगळया धुमश्चक्रीतच कॉंग्रेस (आय)च्या नेत्यानी नवा सूर काढला आहे. ते म्हणतात, आगामी वर्षातील कोणतेही पद आम्हाला नको. फक्त महापौरपद द्या! त्याच्या सूचनेनुसार नागरी संघटनेला स्थायी समिती अध्यक्षपद, भाजपला उपमहापौरपद व वाहनव्यवहार समिती अपक्ष गटाला–'जनता' ला गेल्या वर्षी शिक्षणमंडळासाठी सधी दिली आहे व सध्या वाहनव्यवहार समितीचही अध्यक्षपद त्याच्याकडेच आहे म्हणून तूर्त इतर काही नाही, असा हा सूर आहे.

पण हे प्रत्यक्षात येईल का? कारण 'भाजप' महापौरपदाची संधी सोडील का? शिवाय स्थायी समितीत कॉंग्रस (आय)चे आता चार सभासद आहेत. पक्षबदलामुळ दोन वाढतील. अपक्ष एक मत आहेच. अशा परिस्थितीत सहजासहजी मिळत असललं अध्यक्षपद कॉंग्रेस (आय) कशाला सोडील? पण अनेक लोकाच्या नाराजीमुळ कॉंग्रस (आय)चे नगरसेवक मतं एकाच ठिकाणी टाकतील का? पुलोद आघाडीतर्फे भाजपची म्हणजे पर्यायान श्री. शिवाजीराव आढाव याची उमेदवारी येईल अस आता तरी वाटतं; पण पुलोद आघाडीतली एक-दोन मतं 'सशयास्पद' आहेतच. यात पुन्हा अपक्षाची काय भूमिका हा प्रश्न आहेच. कारण सध्या 'बर्लन्सिग पॉवर' त्याच्या हाती आहे. ते म्हणतील ते प्रमाण, हे सध्या तरी आहे. त्यामुळ निवडणूक होईलच का, इथपासून तर्क करायला पाहिजेत. शिवाय महापालकेच्या बाहेर राहून 'पपेट'चा खेळ करणाऱ्याचा यंदा काय विचार आहे हाही तेवढाच किंबहुना जास्त महत्त्वाचा मुद्दा आहे.

–प्रतिनिधी

# राजहंस प्रकाशन सूची

| | | | |
|---|---|---|---|
| १. | टॉलस्टॉय–एक माणूस | सौ. सुमती देवस्थळे (दु. आवृत्ती) | रु. ५५–०० |
| २. | मॅक्झिम गॉर्की | ,, ,, | १०–०० |
| ३. | नाझी भस्मासुराचा उदयास्त | वि. ग. कानिटकर | ४५–०० |
| ४. | महाडचा मुक्तिसंग्राम | प्रा. रा. म. बिवलकर, प्रा. झुंबरलाल कांबळे | २०–०० |
| ५. | लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी | पु. ल. इनामदार | २०–०० |
| ६. | एक होता कार्व्हर | सौ. वीणा गवाणकर | १५–०० |
| ७. | पश्चिमेचे पुत्र | रवींद्र पिंगे | १४–०० |
| ८. | देवाघरचा पाऊस | ,, ,, | १०–०० |
| ९. | हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा | अशोक परळीकर | १२–०० |
| १०. | सांगत्ये ऐका | हंसा वाडकर (ति. आवृत्ती) | १२–०० |
| ११. | रातराणी | विजय तेंडुलकर | १२–०० |
| १२. | आर् डॉक्युमेंट | अशोक जैन | १०–०० |
| १३. | टच् | अशोक प्रभाकर डांगे | १०–०० |
| १४. | गुजराथेतील मराठी राजवट | बि. गो. खोबरेकर | ७–०० |
| १५. | पूर्णिया | अनिल अवचट (दु. आवृत्ती) | ६–०० |
| १६. | परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस | २–०० |
| १७, | सहा साहसे | दा. सी. देसाई | २–०० |

**राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, नागनाथ पाराजवळ, पुणे ३०**

रंगभूमी

# माझं काय चुकलं?

## परिणामकारक....

'माणूस'च्या दोन वर्षांपूर्वीच्या दिवाळी अंकात श्री. रत्नाकर मतकरीची 'जौळ' नावाची कादंबरी प्रसिद्ध झाली होती. त्याच कादंबरीचे नाटय-रूपांतर नाटयसुमन या संस्थेने 'माझं काय चुकलं?' या नाटकाद्वारे रंगभूमीवर आणले आहे.

कादंबरी 'माणूस'मध्येच प्रसिद्ध झालेली असल्याने नाटकाची कथा मी पुन्हा सांगण्याची आवश्यकता नाही. कोणत्याही लग्नानंतर सासू आणि सुनांचे होणारे भांडण, त्या दोघींचा एकाच पुरुषावर–मुलगा आणि नवरा म्हणून–हक्क सांगण्याचा अट्टाहास या खरे म्हणजे आपल्या आजूबाजूला कित्येक कुटुंबांमध्ये घडणाऱ्या घटना; पण त्या घटनांचा आधार आणि प्रवाह घेऊन मतकरींनी उभ्या केलेल्या व्यक्तिरेखा आणि त्यातही प्रसाद साने या नायकाच्याद्वारे मरणकल्पनेचे रंगविलेले काही गडद, काही धूसर, काही हलके, काही तलम रंग यामुळे ती साधीसुधी, साच्यातील कथा असूनही कादंबरी मात्र एका वेगळयाच पातळीवर पोहोचली होती. कादंबरीचे स्वरूप हे एकेका पात्राने केलेल्या आत्मनिवेदनाचे होते. अशा कादंबरीचे नाटयरूपांतर करताना जर त्यातील या मरणकल्पनेच्या वेधाकडे दुर्लक्ष झाले असते, तर हे नाटयरूपांतर म्हणजे काळाप्रमाणे थोडेसे बदललेले बाळ कोल्हटकरी कौटुंबिक नाटक अर्थात सासू-सुनेचा कज्जा आणि नवऱ्याचा फज्जा ठरले असते, पण हे नाटयरूपांतर दस्तुरखुद्द कादंबरीकारानेच केले असल्यामुळे कादंबरीच्या या प्रमुख धाग्याला त्यांनी नाटकातही महत्त्व दिलेले आहे. मात्र 'आत्मनिवेदन' या प्रकारामुळे कादंबरीत जितक्या प्रकर्षाने हा धागा वाचकाला आवळतो, बांधून टाकतो, कधीकधी कापूनही काढतो, तितक्या प्रमाणात नाटकात त्या धाग्याचा चिवटपणा वा धारदारपणा जाणवत नाही. यासाठी कादंबरी ते नाटक हा माध्यमबदलाचा प्रवास जबाबदार असला तरी त्यामुळे बरेचदा नाटक आधी उल्लेखलेल्या बाळ कोल्हटकरी पातळीवर उतरते. कादंबरी ते नाटक हा माध्यमबदल होत असताना मूळ कादंबरीच्या स्वरूपात योग्य ते फेरफार होणे आवश्यक होतेच. स्वतः रत्नाकर मतकरींना नाटयमाध्यमाची उत्तम जाण असल्यामुळे त्यांनी हा बदलाचा सांधा अतिशय कुशलतेने हाताळला. अत्यंत योग्य जागी येणारी प्रसाद, नयन आणि सिंधूताईंची आत्मनिवेदने, संपूर्ण कादंबरीची तीन अंकामध्ये केलेली विभागणी–विशेषतः प्रसाद आणि नयनच्या आत्महत्येच्या निश्चयाने संपणारा दुसरा अंक आणि प्रसादचा मृत्यू व जखमी नयन या घटनांनी सुरू होणारा तिसरा अंक, घटनांमधून ठेवलेला नाटकाचा प्रवाहीपणा-(अपवाद फक्त काही 'आसवांचा पूर' प्रसंगांचा–खरे तर प्रवेशांचा)–याला नाटकाचे संवादही जबाबदार, अशी या उत्तम साधलेल्या बदलाची काही ठळक उदाहरणे. तांत्रिकदृष्टया खटकलेली किंवा चुकलेली एकमेव गोष्ट–नाटकाच्या सुरुवातीलाच डॉ. भाईसाहेब भागवत नावाचे गृहस्थ ही संपूर्ण घटना किंवा गोष्ट म्हणू हवे तर, आपल्या ओळखीच्या कुटुंबातच घडलेली घटना म्हणून प्रेक्षकाना सांगतात. नाटकाच्या सुरुवातीला घेतलेली ही निवेदकाची शैली पुढे काही वेळा नाटक पुढे सरकवण्यासाठी वापरली असती (तिसऱ्या अंकात नयनचा भाऊ–गुरूचे निवेदन–कथा पुढे सरकविते.) तरी त्यामुळे एक प्रश्न अनुत्तरित राहतो,–प्रसादची मनस्थिती, मरणाबद्दलचे त्याचे आकर्षण, काही घटना ज्या फक्त त्या घटना जगणाऱ्या व्यक्तींनाच माहीत असू शकतात, (उदाहरणार्थ–प्रसाद आणि नयनचे काही संवाद वा प्रसंग) त्या या उपऱ्या निवेदकाला कशा कळल्या? अर्थात संपूर्ण नाटकाच्या ओघात कदाचित ही गोष्ट जाणवण्याइतपत वा खुपण्याइतपत लक्षातही येणार नाही.

नाटकाचे दिग्दर्शक अरविंद देशपांडे. कोणत्याही चमत्कृती–तन्त्राचा (गिमिकचा) वापर न करताही एक परिणाम साधता येतो, तो परिणाम 'दिन दिन दिवाळी' सारख्या रंगीबेरंगी झोतांपेक्षा वा तत्सम त्रासदायक गोष्टींपेक्षा अधिक प्रभावी असतो आणि तो मानवी शरीराच्या आणि चर्येच्या छोटयामोठया नैसर्गिक क्रिया–प्रतिक्रियांमधून उभा करता येतो, याचा उत्तम वस्तुपाठ म्हणजे या नाटकाचे दिग्दर्शन. नाटकात शब्दाशब्दाला आणि पावला–पावलाला दिलेला न्याय, एका पात्राच्या कृतीला प्रत्येक वेळी मिळणाऱ्या इतराच्या वैयक्तिक आणि सामूहिक प्रतिक्रिया, संघर्ष–प्रसंगामध्ये दोन पात्रांमध्ये अथवा पात्रसमूहामध्ये साधला जाणारा तोल या सगळयामधून नाटकाला जिवंतपणा मिळतो. अशा रंगलेल्या प्रसंगांमुळेच काही विनोदी बाळ कोल्हटकरी प्रसंग धकून जातात. अन्यथा नयनेला पाहण्याचा प्रसंग वा भाईसाहेब भागवतानी सिंधूताईंना स्वत:ची आई मानून आपल्याकडे राहण्याचा केलेला आग्रहवजा विनंती हा प्रसंग-असे काही प्रसंग हसू न येता पाहणे जरा अवघडच होते किंवा काही वेळा काही पात्रानी (विशेषतः भाईसाहेबानी) सांगितलेल्या इसापनीती वा पंचतंत्र तात्पर्यांची टिंगल न करता ती ऐकून घेणे अशक्य होते. अत्यंत मोजके संगीत (त्यात धडाडत जाणाऱ्या लोकलच्या आवाजाचा सुरेख वापर), प्रसादच्या दोन चाळकरी खोल्या–त्यातील मृत वडिलांच्या फोटोपासून पडदा लावलेल्या मोरीपर्यंत नेटक्या उभ्या करणे (यात अर्थातच नेपथ्यकाराचाही मोठा वाटा), आवश्यक तेवढयाच प्रकाशयोजना इत्यादी सगळयाच गोष्टीवरून अरविंद देशपांडयांचा सुबक हात फिरलेला जाणवतो. (मी पाहिलेल्या प्रयोगात दोन–तीन वेळा प्रकाशसंयोजकानी नको तेव्हा अंधार करून आणि नको तेव्हा प्रकाश टाकून प्रेक्षकांची करमणूक आणि पात्रांची पंचाईत केली.)

नाटक परिणामकारक बनविण्यात सर्वच कलाकारांचा फार मोठा वाटा असला तरी नयन (मीनल परांजपे), सिंधूताई (भावना) आणि प्रसाद (दिलीप कुलकर्णी) या प्रमुख कलाकाराचा वाटा सिंहाचा. अन्य कलाकारांपैकी ज्योती पाठाऱ्यांनी उभी केलेली सुमी आणि बाळ वापटानी रंगविलेला बळवतमामा प्रभावी.

सरतेशेवटी फक्त एकच शंका–

मूळ कादंबरीचे नाव होते 'जौळ.' जर

MANOOS (Marathi Weekly) 100 Paise Regd. No. PNC–W 28
(Licensed to post without prepayment of postage–No. 11)

प्रसिध्द दलित-साहित्यिक दया पवार यांच्या 'बलुतं' या कादंबरीवर निघणारा 'अत्याचार' हा चित्रपट याच प्रवृत्तीतला.

छोटया, सुटसुटीत अशा नावाचं वेड सोडून काही जणांना मोठी, लांबलचक नावं देण्याचही वेड लागतं. व्ही. शांताराम यांनी 'डॉ. कोटणीस की अमर कहानी', 'जल बिन मछली नृत्य बिन बिजली' अशी नावं दिली आहेत, तर सईद मिर्जा या नव्या दमाच्या दिग्दर्शकानं 'अरविंद देसाई की अजीब दास्तां' या नावाचा चित्रपट काढला. पुढे या चित्रपटातील आशयाला उत्तर म्हणून 'अल्बर्ट पिंटो को गुस्सा क्यों आता है ?' असाच लांब नावाचा चित्रपट काढला. आता यापुढे 'सईद मिर्जा गज भर लंबा शीर्षक क्यो देता है' असा चित्रपटही येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तेव्हा 'नावात काय आहे' असं म्हणणं सोपं आहे; पण इथं नावामागं बरंच काही लपलेलं आहे. बाकी नाव मोठं आणि लक्षण खोटं असंच चित्र अनेकदा दिसतं हेही खरंच !

□

## □ फिल्मी गुंडांची चापलुसी

काही आठवडयापूर्वी आम्ही याच सदरात 'गुंडांच्या तावडीत फिल्मी गुंड' या जुहू-पार्ले भागात घडलेल्या घटनाची नोंद घेतली होती; पण गुंडांनी केलेला हा हल्ला ही या 'फिल्मी गुंडानी' प्रसिद्धी अथवा विम्याच्या पैशासाठी केलेल्या 'कटा'चाच भाग असल्याचं नुकतंच एका साप्ताहिकानं प्रसिद्ध केलं आहे.

या साप्ताहिकानं चक्क या संदर्भात जुहू–पार्ले भागातील सांताक्रूझ पोलीस-स्थानकाचे वरिष्ठ इन्स्पेक्टर एम. एम. तेलंग यांचीच मुलाखत घेऊन हे प्रसिद्ध केलं आहे.

ते म्हणतात की, आम्ही जेव्हा या चित्रपट-मंडळीचा संबंध असलेल्या 'केसेस' ची चौकशी करतो तेव्हा अनेक अडचणी समोर उभ्या राहतात. या मंडळीच्या केसमध्ये पुष्कळ वेळा काळा पैसा अथवा एखादं 'लफडं' असतं. चित्रपट–मंडळीची 'इमेज' जपण्यासाठी ही मंडळी आमच्यावर दबाव आणतात तो त्याचा राजकीय मंडळीवर असलेल्या प्रभावाचा वापर करून ! त्यामुळं चौकशी करणं तर राहोच, पण याबाबत काही वाच्यता करणंही आम्हाला अवघड जातं.

शक्तीकपूरच्या घरी नुकत्याच झालेल्या चोरीबाबत बोलताना इन्स्पेक्टरसाहेबानी म्हटलं आहे की, शक्तीकपूरला प्रसिद्धीची हाव आहे. त्यामुळं त्याच्या फ्लॅटवर चोरी झाली त्या वेळी त्यानं प्रथम हे प्रकरण सायंदैनिकात फ्लॅश कसं होईल याकडेच लक्ष दिलं. चोरी झाल्याबाबत फारशी माहिती न देता प्रसिद्धी कशी मिळेल याचाच विचार त्याच्या मनात घोळत होता.

श्री. तेलंग पुढं असंही म्हणतात की, वृत्तपत्रातील भडक रिपोर्टपेक्षा पोलीस-रिपोर्ट बराच वेगळा होता. शक्तीकपूरने तर पोलिसाना तपशील सागण्यासच नकार दिला !

अमजदखानवर हल्ला झाल्याचं नुकतंच वृत्तपत्रात आलं होतं, त्याची नोंद आम्हीही या सदरात घेतली होती. याबाबत श्री. तेलंग म्हणतात की, करोडो रुपये मिळविणारा अमजदखान आपल्या मर्सडीस गाडीला झालेलं डॅमेज दाखवून विमा वसूल करण्यात गुतला होता, यावर कोण विश्वास ठेवील ? घटना घडल्यानंतर पोलिसात तक्रार नोंदविण्याऐवजी विम्याच्या पैशावरच अमजदचा डोळा होता !

तेव्हा अमजद काय किंवा शक्तीकपूर काय, सातत्याने खलनायकाच्या भूमिका करून 'डावपेच' करण्याचा त्यांच्यावर परिणाम् होणं साहजिकच आहे, हे पोलिसांनीही लक्षात घ्यावं; म्हणजे तेही 'फिल्मी पोलीस' शोभतील हेच खरं.

या मुलाखतीच्या निमित्तानं तेलंग यांनी आणखीही गमतीदार अनुभव सांगितला आहे. 'गॉसिप' ला कंटाळून धर्मेंद्रने कृष्णा या फिल्म जर्नालिस्टवर हल्ला केला. त्याबाबत धर्मेंद्रला पकडण्यासाठी वॉरन्ट घेऊन काही पोलिसाना पाठवलं. त्या वेळी पनवेल येथे धर्मेंद्रचं शूटिंग चालू होतं. तर हे पोलीस तेथे जाऊन शूटिंगच बघत बसले – धर्मेंद्रला कशी अटक करायची या प्रश्नाचा विचार करीत !

—बिलंदर

सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही. —डॉ. य. दि. फडके

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर / प्रा. झुंबरलाल कांबळे
मूल्य : वीस रुपये. राजहंस प्रकाशन, पुणे ३०.